www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले    उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड    कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे    निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील    सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २    अंक : 305    शनिवार दि. १९ जुलै २०२५    किंमत : ४ रु    पृष्ठ : ४    RNI MAHMAR/2023/89514

# नवी मुंबई महापालिका पदभरती परिक्षेदरम्यान पर्यवेक्षकावरच गुन्हा दाखल !

## कोल्हापूर जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाचीच परीक्षकाला मदत करण्याचा प्रकार

नवी मुंबई – नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती -२०२५ बाबत ऑनलाईन परीक्षा १६ जुलैपासून ते १९ जुलैपर्यंत घेण्यात येत असून महाराष्ट्रातील विविध ११ जिल्ह्यात २८ केंद्रावर या परीक्षा घेण्यात येत असून १६ जुलै रोजी दुपारी १ ते ३ वा. च्या परीक्षा सत्रात कोल्हापूर जिल्हयातील परीक्षा केंद्रावर उपस्थित पर्यवेक्षकामार्फत विद्यार्थ्यास परीक्षेच्या दरम्यान उत्तराचा पुरवठा केला गेल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत तातडीने चौकशी करण्यात आली असून पर्यवेक्षकामार्फत एका उमेदवारास २ ते ३ प्रश्नांची उत्तरे उमेदवाराने न विचारता पर्यवेक्षक सांगत असल्याचे सिसिटिव्ही चित्रीकरण पाहणी केली असता निदर्शनास आलेले आहे.

त्यामुळे सदर पर्यवेक्षकास त्वरीत पर्यवेक्षक पदावरुन हटविण्यात आले असून कोल्हापूर जिल्हयात नियुक्त नवी मुंबई महानगरपालिकेचे परीक्षा समन्वय अधिकारी यांचेमार्फत परीक्षा घेणा-या टिसीएस संस्थेस सदर पर्यवेक्षकावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार परीक्षा घेणा-या संस्थेमार्फत संबधित पर्यवेक्षकावर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. याबाबत परीक्षा पर्यवेक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पालिकेने दिली आहे

नवी मुंबई महानगरपालिकेची परीक्षा प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने होण्याकरिता अगदी सुरुवातीपासून संपूर्ण दक्षता घेण्यात आलेली असून परीक्षापूर्व व परीक्षा कालावधीतही सर्व बाबींवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यामुळे परीक्षेस प्रविष्ट झालेल्या उमेदवारांनी परीक्षा प्रक्रियेबाबत कोणत्याही प्रकारची संदिग्धता बाळगू नये व अफवांना बळी पडू नये असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिकेच्या ६६८ जागांसाठीच्या पदभरतीला चांगला प्रतिसाद लाभला असून कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसून पारदर्शक पदध्तीने होणाऱ्या भरतीबाबत चुकीचा प्रकार निदर्शनास आल्याने संबंधित प्रकरणी पालिकेने टीसीएस या एजन्सी कंपनीला तात्काळ कारवाईचे निर्देश दिले असून संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून
### शासनाच्या दरबारात

### बस स्थानक ते होळकर चौकापर्यंत रस्त्याची अत्यंत बिकट अवस्था तसेच घाणीचे साम्राज्य

**सत्यदृश्य नागरिकांचीहाक स्वच्छतेचा सवाल**





**फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत**

**दैनिक व आधारचे लातूर प्रतिनिधी**
**मोहम्मद पिंजारी**

" मुरुड शहराच्या बस स्थानक ते होळकर चौकापर्यंत रस्ता पूर्ण उखडलेला असून मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत त्यामुळे पाणी साचून घान मोठ्या प्रमाणात होत आहे तसेच तलावाच्या बाजूने मोठ्या प्रमाणात घानीचे साम्राज्य पसरले आहे तसेच दुर्गंधी ही पसरलेली आहे त्या मुळे डुकरांचा वावर वाढलेला आहे मात्र ग्रामपंचायतचे दूर लक्ष हा चिखल नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्यावरचा गंभीर आघात आहे! डास, दुर्गंधी आणि संसर्गजन्य रोगांच्या छायेत जगणारे नागरिक प्रशासनाकडून केवळ 'बघ्याची भूमिका' अनुभवत आहेत."

**प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी.**

# ग्राम विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव :-** ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतर्फे मागील हंगामात अनेक शेतकऱ्यांनी पेरणी व लागवडीसाठी ग्राम विविध कार्यकारीच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून पीक कर्ज घेतले होते मात्र निसर्गाचा लहरीपणा अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही परिणामी शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली भरीसभर शेतमालाला सन्मान जनक भाव सुद्धा नव्हता त्यामुळे शेतकऱ्याची कर्ज फेडण्याची ताकद उरली नाही त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अशा आशयाचे निवेदन राळेगाव ग्राम विविध कार्यकारीच्या वतीने तहसीलदार राळेगाव यांना देण्यात आले राळेगाव ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष सचिन हुरकुंडे उपाध्यक्ष राजेश काळे यांनी नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा ठराव मांडला या ठरावाला सर्व संचालकांनी एकमताने पाठिंबा दिला या ठरावानुसार ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्यावतीने तहसीलदार अमित भोईटे



यांना निवेदन देण्यात आले,निवेदनामध्ये शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना येणाऱ्या हंगामासाठी पुन्हा नव्याने पीक कर्ज द्यावे नैसर्गिक संकटामुळे तसेच सुलतानी सरकारमुळे कर्जबाजारी झालेले शेतकरी अडचणीत आहेत त्यांना पुन्हा उभारी घेण्यासाठी तातडीने कर्जमाफी करून दिलासा द्यावा सोबतच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना शासनातर्फे पन्नास हजाराचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार होते अजूनही राळेगाव ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या ९४ नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजाराचे अनुदान मिळाले नाही ते सुद्धा शासनाने द्यावे सोबतच गेल्या दोन-तीन वर्षाचे शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे शासनाकडे प्रलंबित आहे ते सुद्धा शासनाने त्वरित वितरित करावे. सद्यस्थितीत शेतकरी आर्थिक अडचणीत आहे अशावेळी शासनाने कर्जमाफी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजाराचे प्रोत्साहन पर अनुदान पिक विम्याचे पैसे उपलब्ध करून दिले तर शेतकऱ्यांना संकट काळात मोठा आर्थिक दिलासा मिळेल निवेदन देतेवेळी अध्यक्ष सचिन हुरकुंडे,उपाध्यक्ष राजेश काळे,संचालक जानराव गिरी,अशोक पिंपरे,विनायक नगराळे,विनोद नरड,गजानन पाल,नितीन महाजन,कृष्णाजी राऊळकर,तातेश्वर पिसे,प्रभाकर राऊत,शेतकरी लियाकत सैय्यद,प्रवीण महाजन,सुमित डाखोरे,किरण राऊत, कर्मचारी अजय भावे आदि उपस्थित होते.

# अपघात होऊन झाले 3 महिने तरीही संबंधित विभागाचे दुर्लक्ष



**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यातील वडघर गावाजवळ एका धावत्या गाडीने पेट घेतला होता त्यामध्ये गाडी पूर्णपणे जळून खाक झाल्याचे दिसत आहे, पण या घटनेला 3 ते 4 महिने उलटून देखील गाडी अजून त्याच ठिकाणी रस्त्या मधेच उभी असल्याची पहायला मिळतेय, श्रीवर्धन मध्ये पर्यटकांची वर्दळ चालू असते आणि झालेल्या अपघात ठिकाणीच एक तीव्र वळण असून तिथे अजून अपघात होण्याची दाट शक्यता आहे.. तरी त्या वाहनाची योग्य ती विल्हेवाट लावून वाहन रस्त्यावरून बाजूला करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे..

# शंकरराव चव्हाण जयंतीचे औचित्य साधत कवळे गुरुजींकडून शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी पाऊल – १०० शेतकऱ्यांना पुणे येथे प्रशिक्षणासाठी पाठविले

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

मराठवाड्याचे भाग्यविधाते, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय डॉ. शंकररावजी चव्हाण, यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवत,कवळे गुरुजी यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. चव्हाण साहेबांनी जसे मराठवाड्यातील शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून धरणांची निर्मिती केली, तसेच कवळे गुरुजींनी देखील ऊस कारखानदारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रात्र दिवस झटत आहेत.. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, आधुनिक तंत्रज्ञान शिकून त्यांनी प्रगतिशील शेतीकडे वाटचाल करावी, यासाठी कवळे गुरुजींनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट व्ही.एस.आय, पुणे येथे तब्बल १०० शेतकऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवले आहे. त्या ठिकाणी शेतकऱ्यांना ऊस लागवड उत्पादन वाढ प्रक्रिया शाश्वत शेती अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे कवळे गुरुजींचा उद्देश स्पष्ट आहे डॉ. शंकरराव चव्हाण साहेबांच्या संकल्पनेतील समृद्ध शेतकरी तयार करणे.चव्हाण साहेबांचे स्वप्न होते की मराठवाड्यातील आणि विशेषत नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या




सक्षम झाला पाहिजे. त्यांच्या ह्या विचारांना पुढे नेण्याचे कार्य कवळे गुरुजी सातत्याने करत आहेत. कारखानदारी हा फक्त व्यवसाय नसून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचा एक आधार असल्याची त्यांची ठाम भूमिका आहे. याच भूमिकेतून आज कवळे गुरुजींच्या पुढाकाराने तीन ते चार ऊस कारखान्यांची स्थापना झाली आहे. हे केवळ उत्पादन केंद्र नसून शेतकऱ्यांना बाजारपेठ शिक्षण रोजगार आणि तांत्रिक ज्ञान यांचं एक ह्या भागातील शेतकऱ्यांच्या हक्काचं घर आहे. व्हि,पी,की उद्योग समूह व कुसुमनगर वाघलवाडा येथील एम.व्ही. के. साखर कारखाना हे एक यशस्वी तेच उदाहरण आहे. यावर्षी डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती जण संपर्क कार्यालय कवळे गुरुजी कॉम्प्लेक्स उमरी, सिंधी ग्रामीण रुग्णालय, कुसुमनगर वाघलवाडा कारखाना या ठिकाणी साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जीवनकार्यावर आधारित माहिती व प्रेरणादायी भाषणांचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थितांनी उभे राहून मौन पाळले आणि त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण आदरांजली वाहिली. यानंतर त्यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपत्रकाचे वाचन करण्यात आले. त्यांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांवर प्रकाश टाकण्यात आला डॉ. चव्हाण, यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी मराठवाड्याच्या शिक्षण, आरोग्य, सिंचन, दळणवळण, उद्योग आणि सामाजिक न्याय क्षेत्रातही अनेक ठोस पावले उचलली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना हे त्यांचे शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान. यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य उजळले.

गोदावरी खोरे विकास महामंडळाची स्थापना करून त्यांनी मराठवाड्यात सिंचन प्रकल्पांना चालना दिली. यामुळे पाण्याच्या उपलब्धतेत वाढ होऊन शेतीत क्रांती घडली ग्रामीण आरोग्य सुविधांची उभारणी रस्त्यांचे जाळे, विमानतळ विकास, शासकीय वसतिगृहे, महाविद्यालये, वसाहती या सर्व बाबींमध्ये त्यांनी दूरदृष्टी दाखवली त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये म्हणजे निर्णयक्षमतेची धार लोकहिताचे भान आणि प्रत्येक घटकासाठी विचार करणारा सर्वसमावेशक दृष्टिकोन कार्यक्रमात कवळे गुरुजींनी मनोगत व्यक्त करताना डॉ. चव्हाण यांच्याविषयीचे आपले अनुभव आणि प्रेरणा शब्दबद्ध केली. ते म्हणाले: डॉ. शंकररावजी चव्हाण, हे एक सामान्य शेतकऱ्याच्या पिढीतून आलेले पण असामान्य ध्येयाने प्रेरित नेतृत्व होते. त्यांनी कधीही सत्ता ही केवळ सत्तेसाठी वापरली नाही तर ती लोककल्याणासाठी उपयोजित केली. त्यांच्या निर्णयप्रक्रियेत तळागाळातील माणूस केंद्रस्थानी असायचा. मराठवाड्याणळऐचा विकास हे त्यांचे जीवनध्येय होते. त्यांनी स्वप्ने पाहिली ती संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी. अशा नेत्यांचे स्मरण म्हणजे आपल्यासाठी एक नवसंजीवनी आहे. त्यांनी ग्रामीण रुग्णालय सिंधी येथील बोलताना म्हणाले आज आपण ज्या रुग्णालयात कार्यरत आहोत, त्या सुविधांचा पाया त्यांच्याच विचारांमध्ये सापडतो

# शिवसेना (उद्धव ढाकरे) पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे

## खोपटा कोप्रोली रस्त्याच्या कामाला सुरुवात.

**दैनिक युवक आधार**
**उरणशहर प्रतिनिधी**



खड्डे पडून अक्षरशः रस्त्याची चाळण झालेल्या आणि प्रवासी जनतेला प्रवासादरम्यान नाकीनऊ आणणाऱ्या खोपटा कोप्रोली या मुख्य रहदारीच्या रस्त्याच्या दुरावस्थेवर अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला झुकावं लागले. गेली दोन अडीच वर्ष रखडलेल्या या मार्गाच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाला अखेर बुधवारी दि.16 जुलै रोजी मुहूर्त मिळाला. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

या रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली होती की वाहन चालकांना वाहने चालविणे अवघड होऊन बसले होते. रस्त्याच्या दुरावस्थेबद्दल नुकतीच शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नेते मंडळी आणि कार्यकर्त्यांनी उरण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता नरेश पवार यांची भेट घेऊन या रस्त्याच्या दुरुस्ती बाबतचे गाऱ्हाणे मांडून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली होती. दोन वर्ष रखडलेल्या या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामास सुरुवात न केल्यास शिवसेना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशाराही दिला होता,

मात्र बुधवारी (दि.१६) सकाळीच हा इशारा प्रत्यक्षात आणीत खोपटा पुलाजवळ माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, तालुका संघटक बी एन डाकी उपतालुकाप्रमुख रुपेश पाटील, विभाग प्रमुख भूषण ठाकूर आणि उरण पूर्व विभागातील पदाधिकारी व शिवसैनिक, कार्यकर्त एकत्र येत रास्ता रोकोचा इशारा देत प्रशासनाला खडबडून जागे करीत शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता नरेश पवार, नरेश सोनवणे, उपअभियंता व कर्मचाऱ्यांनी आंदोलनकर्त्यां शिवसैनिकांची भेट घेऊन रस्त्याच्या कामाला ताबडतोब सुरुवात करत असल्याचे सांगितले. तर या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्णत्वास जाईल अशी ग्वाही उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी दिली. याप्रसंगी अनंत पाटील, सरपंच अनामिका म्हात्रे, माजी सरपंच भावना म्हात्रे, माजी तालुका प्रमुख राजीव म्हात्रे, चिरनेर सरपंच भास्कर मोकल, कोप्रोली शाखाप्रमुख रवी म्हात्रे, खोपटे शाखाप्रमुख नंदकुमार ठाकूर, रितेश ठाकूर, गणेश म्हात्रे, जयंत म्हात्रे, प्रांजल पाटील, लक्ष्मण ठाकूर, गजानन वशेणीकर दिपक म्हात्रे, गणेश वशेणीकर, महेश कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.

# पार्डी ते वानेगांव जाणाऱ्या रस्त्याचे काम त्वरित करा

## वंचित बहुजन आघाडी ची मागणी

**दैनिक युवक आधार**
**राजू गायकवाड उमरखेड तालुका प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील पार्डी ते वानेगाव येथील रस्त्याचे काम पुसद येथील कंत्राटदाराने घेतले असून मागील वर्षीच्या पावसाळ्यापूर्वीपासून संबंधित कंत्राटदार काम पूर्ण न करता गावातील महिला पुरुष शाळकरी मुले अबालवृद्ध यांच्या जीवनाशी खेळत आहेत हा रस्ता आज रोजी अक्षरशा चिखलमय झाला मागील पावसाळ्यासह आज सुद्धा या रस्त्यावरून ये जा करताना अनेकांचे छोटे-मोठे अपघात झाले सुदैवाने यात जीवित हानी झालेली नाही परंतु रस्त्याचे काम त्वरित न केल्याने या रस्त्यावरील अपघातात कुणाचे बरे वाईट होण्याची शक्यता नाकारता येत नाही ही बाब संबंधित ठेकेदारास गांवकरी मागील वर्षापासून सांगत आहोत परंतु ठेकेदार हे दुर्लक्ष करीत आहेत स्वतःच्या फायद्यासाठी वारंवार कामाची मुद्दत वाढून घेत आहेत. गावातील प्रसुती महिला आजारी व्यक्ती यांना दवाखान्यात जाताना काही बरे वाईट झाले तर या गोष्टीस कंत्राटदार व शासन जबाबदार धरण्यात येईल असे निवेदन वंचित बहुजन आघाडी च्या वतिने बाधकाम विभागा ला दिले निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव डी के दामोधर, तालुका अध्यक्ष संबोधि गायकवाड, संतोष गायकवाड, सचिन खंदारे ,पी एल आठवले, केशरबाई पाईकराव अध्यक्ष सावित्रीबाई फुले महिला मंडळ, गणेश वाठोरे, शेख दानिश ,शेख सलीम शेख मुनीर ,संभाजी बहादुरे इत्यादींच्या सह्या आहेत.



# संत रामपाल जी महाराज यांच्या सत्य ज्ञानाचा महासत्संग!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

"राम बुलावा भेजिया दिया कबीरा रोए ।
जो सुख हैं सत्संग में वो बैकुंठ में ना हो"

रविवार.दि २०/०७/२०२५ रोजी मुक्तिधाम, शांतिधाम जोशी जागीर हाल पारसी वाड़ा,चकाला, साहर रोड अंधेरी ईस्ट ४०००९९येथे संत रामपाल जी महाराज यांच्या सत्य ज्ञानाचा महासत्संग आयोजित करण्यात आला आहे.

संत रामपाल जी महाराज यांचा सत्संग हा अध्यात्मिक मार्गदर्शनासाठी अत्यंत



महत्त्वाचा आहे. या सत्संगांमध्ये संत रामपाल जी महाराज मानवजातीला शाश्वत शांती, मोक्ष आणि खऱ्या धर्म ज्ञानाचा मार्ग दाखवतात.त्यांच्या प्रवचनांद्वारे श्रोते वेद, गीता, कुराण, बायबल आणि गुरु ग्रंथ साहिबातील सखोल ज्ञान आत्मसात करतात.

सत्संग आयोजनात संत रामपाल जी महाराज समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, व्यसन आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी जनजागृती करतात.त्यांच्या

प्रवचनांमध्ये भक्ती मार्गाचा खरा अर्थ, ईश्वरप्राप्तीचा

सुलभ मार्ग आणि साधनेचा महत्वाचा विषय स्पष्टपणे मांडला जातो.सत्संगात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क नसते, आणि सर्वांसाठी आणि सर्वांसाठी प्रवेश खुला असतो. येथे ( चाय बिस्केट ) पाणी व पार्किंग सुविधा उपलब्ध असते. या कार्यक्रमांमध्ये प्रवचन, आणि आत्मा शुद्धीकरणाचे तत्त्वज्ञान शिकवले जाते.

सत्संगाच्या माध्यमातून संत रामपाल जी महाराज हजारो लोकांना व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करतात. त्यांच्या शिक्षणामुळे सामाजिक सुधारणा होत आहे आणि अनेक लोक आध्यात्मिक आनंद व समाधान अनुभवत आहेत. सत्संग ही मानवतेच्या उत्थानाची दिशा दाखवणारी प्रकाशमान ज्योत आहे.

# पनवेल महानगरपालिकेने अभय योजना लागू केल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे मानण्यात आले आयुक्त मंगेश चितळे यांचे आभार

दैनिक युवक आधार

पनवेल (वार्ताहर): पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशाने व त्यांच्या अधिकारांतर्गत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत देण्याकरीता “ अभय योजना “ लागु करण्यात आली , यामधुन आता जरी पनवेल मधील नागरीकांकरीता शास्तीमधील दिलासा मिळाला असला तरी शिवसेना पक्षाच्या वतीने संपुर्ण करमाफी करीता पुढील काळात हा लढा चालुच राहील, असे असले तरी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे



मानण्यात आले आयुक्त मंगेश चितळे यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या सुचनेनुसार आयुक्त मंगेश चितळे यांचे शिवसेना पनवेल महानगरप्रमुख अवचित राऊत , पनवेल शहर प्रमुख प्रवीण पोपटराव जाधव , खांदा कॉलनी शहरप्रमुख सदानंद शिर्के , कामोठे शहरप्रमुख रामदास गोवारी, कळंबोली शहरप्रमुख सूर्यकांत म्हसकर, तळोजा शहरप्रमुख प्रदीप केणी, पनवेल उपशहर सनी टेमघरे, प्रशांत नरसाळे , अमित माळी ,संतोष तळेकर , मयुरेश पाटील यांनी आभार मानले.

# लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाउन संघटनेची मासिक सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल जिल्हा 3231-A1 लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाउन या संघटनेच्या वतीने लायनइजम वर्ष 2025–2026 मधील पहिली मासिक सर्वसाधारण सभा16/ जूलै2025 रोजी किंग्स्टन जी.डी. आंबेकर मार्ग,काळाचौकी येथे मुंबईचे माजी नगरपाल, लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3231A1 डिस्ट्रिक्ट गव्हर्नर 2023-24, लायन्स क्लब ऑफ मिडटाउन प्रेसिडेंट लायन डॉ.जगन्नाथराव हेगडे यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. सदर सभेत पदाधिकारी व सदस्य यांना लायन्स क्लब ची नीतिमूल्ये,मिडटाऊनची सदस्य संख्या वाढवणे,संघटनेच्या पदां विषयी माहिती देऊन पुढील वर्षासाठी संघटनेच्या वतीने होणारे कार्यक्रम व त्यातील सहभाग तसेच इंटरनॅशनल कडून आलेले वार्षिक कार्यक्रम हंगर(अन्न दान),पर्यावरण आणि मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांवर सर्वांनी सर्जनशील कल्पना मांडल्या. MISSION 1.5 या इंटरनॅशनल प्रेसिडेंटच्या नेतृत्वाखालील दूरदृष्टीपूर्ण उपक्रमा विषयी माहिती व उपस्थिती बाबत सूचना देण्यात आल्या. क्लब प्रेसिडेंट साहेबांनी ज्यांनी ज्यांनी गेल्या वर्षात संघटनेचे उत्कृष्ट काम केले त्या सर्वांचे कौतुक केले. याप्रसंगी लायन अनुराधा हेगडे, लायन नरेंद्र वाबळे,क्लब सचिव जितेंद्र दगडू (दादा) सकपाळ, खजिनदार लायन विलास डांगे,फर्स्ट व्हॉइस प्रेसिडेंट लायन सौ.ज्योती भोसले,लायन विजय रायमाने, लायन सुभाष भोसले,लायन उदय अशोक पवार,लायन स्वप्निल पंडित,लायन सचिन राऊत,लायन दिगंबर पाटील, लायन स्वप्नील पाटील,लायन राजेश कांबळे,लायन महेश आंब्रे,लायन साईगोपाल चिल्का,लायन दिलीप वरेकर,लायन नंदकुमार बागवे,लायन अशोक पवार,लायन प्रज्ञा बाईत इतर पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.



## सहभाग ..

सभागृहात सहभाग
उठवा तिथे आवाज
कोणआपले सारथी
आशेने पाही समाज

सभागृहा बाहेर कसे
कुणी दाखवती माज
उध्दटविषारी बोलणे
वर्तनाची नाही लाज

विधीमंडळचीगरिमा
संविधानामुळे आज
किती तरी भले नेते
चढवला सुवर्णसाज

शरसंधान चाले नीत
सजून बसे तिरंदाज
कुणाचे बळी जाईल
कधी ना येई अंदाज

चर्चा मंथन नीत हवे
पूर्ण चाले कामकाज
तहकूब बहिष्कार हा
बनला नेहमी रिवाज

लोकशाही विरोधात
नर्तन करी आटबाज
कर्तव्य परायण नेता
कधी येईलं कार्पर्दाज

कठोर कारवाई हवी
कडूऔषध नाईलाज
रे विध्वंसकप्रवृत्तीचा
वेळी करावा इलाज

**- हेमंत मुसरीफ पुणे.**

# शासनाचे कौशल्य विकास उपक्रम समाजाभिमुख व्हावेत

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई.प्रतिनिधी** : शासन निधी देवून नवनवीन लोकाभिमुख उपक्रम राबविते. इस्कॉनसारख्या मूल्याधारित संस्थांनी शासनासोबत भागीदारी केल्यास शासनाचे कौशल्य विकास उपक्रम फक्त तांत्रिक शिक्षणापुरते न राहता, व्यक्तिमत्व घडविणारे आणि समाजाभिमुख बनतील. हे सक्षम आणि सजग नागरिक घडवण्यासाठी फार उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज गिरगाव चौपाटी (मुंबई) येथील इस्कॉन मंदिराला भेट दिली. शिवाय गोविंद सात्विक उपाहारगृहाचे उद्घाटन केले. यावेळी कौशल्य विकास, उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष गौरांग दास, राष्ट्रीय शेअर बाजारचे (एनएसई) व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष कुमार चौहान, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. रामामूर्ती, गोवर्धन इकोव्हिलेजचे सल्लागार रामा सिंग दुर्गवंशी, प्रकल्प प्रमुख नवलजीत कपूर, जननिवास प्रभू यांच्यासह भक्तगण उपस्थित होते. राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, भगवान श्रीकृष्णाच्या मंदिरात पाऊल ठेवताच एक विशेष आध्यात्मिक शांतता व समाधानाचा अनुभव मिळाला. मी सन 2000 मध्ये इस्कॉन आणि गौरांग दास यांच्या सानिध्यात आल्यापासून शाकाहारी झालो. आपल्या देशातील संस्कृती आणि धार्मिकता इतर कोणत्याच देशात नाही. भारत नेहमी संरक्षणात्मक, शांततेच्या मार्गाचा अवलंब करीत आहे. यावेळी राज्यपालांनी आपल्या भाषणात इस्कॉन संस्थेच्या जागतिक पातळीवरील कार्याचा गौरव केला. इस्कॉनची जगभरात १३०० मंदिरे, ११० उपाहारगृहे आणि ६५ शेती समुदाय आहेत. आजपर्यंत त्यांनी ३.८ अब्जांहून अधिक मोफत अन्नदानाचे कार्य केले असून, ‘फूड फॉर लाईफ’ ही जगातील सर्वात मोठी अन्नदान योजना ठरली आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून भारत सरकारच्या ‘मिड डे मील’ योजनेतून चार दशलक्षहून अधिक गरजू विद्यार्थ्यांना सकस अन्न दिले जाते. या कार्याबाबत राज्यपालांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या सात्विक अन्नविषयक प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी ‘ईट राईट इंडिया’, ‘पोषण अभियान’ आणि ‘श्री अन्न’ अर्थात मिलेट्सच्या जागतिक स्वीकाराचा विशेष उल्लेख केला. यावेळी राज्यपालांनी नूतन ‘गोविंदाज’ या नवीन सात्विक उपाहारगृहाला भेट देवून सात्विक अन्नाचा वापर करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. इस्कॉन मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर ती धर्माची आधारशिला आहे, असे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी सांगितले. यावेळी गौरांग दास यांनी राज्यपालांना इस्कॉनच्या कौशल्य विकास उपक्रमांबद्दल माहिती दिली, यावेळी गोवर्धन राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) सात्विक पाककला संस्थेचीही माहिती दिली.

# जामखेड ब्लड स्टोअरेज मार्फत जि.प. शाळेत मोफत रक्तगट तपासणी

## ग्रामस्थ व शाळेने मानले डॉ. खराडे व विकास जरे यांचे आभार

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

आष्टा हरिनारायण (गहिनीनाथ पाचबैल) जामखेड तालुक्यातील जामखेड ब्लड स्टोअरेज चे संचालक विकास जरे यांच्या माध्यमातून व खराडे हॉस्पिटलचे डॉ. युवराज खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी मंगळवार दिनांक १५/७/२०२५ रोजी करण्यात आली. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांला रक्तगट माहिती असने बंधनकारक असुन प्रत्येक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन करताना रक्तगट हा रकाना भरावा लागत आहे. मात्र प्रत्येक विद्यार्थ्यांला आपला रक्तगट माहीत नाही तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांला रक्तगट तपासणीसाठी तालुक्याच्या ठिकाणी किंवा इतरत्र पाठविणे सुरक्षित नसल्याने येथील शाळेचे मुख्याध्यापक मधुकर गळगटे यांनी मातकुळी गावचे सुपुत्र डॉ. युवराज खराडे व जामखेड ब्लड स्टोअरेज संचालक विकास जरे यांना विद्यार्थ्यांची अडचण सांगितल्याने लगेचच जामखेड ब्लड स्टोअरेज चे विकास जरे व बाळासाहेब खराडे यांच्या माध्यमातून मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतच येऊन १६५ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर गळगटे सर यांनी शालेय विद्यार्थ्यांचे मोफत रक्तगट तपासणी केल्याबद्दल जामखेड ब्लड स्टोअरेजचे संचालक विकास जरे, बाळासाहेब खराडे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तर डॉ. युवराज खराडे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी रक्तगट तपासणी करताना पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, बापुसाहेब वीर, शाळेचे सहशिक्षक महाव्दार सर, नागरगोजे सर, माने सर, श्रीमती डमाळे मॅडम, श्रीमती मनीषा इंगळे मॅडम आदी मान्यवर उपस्थित.



# प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्या दोषींवर कारवाई करा

## संभाजी ब्रिगेडचे तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकुर**

संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे नुकताच हल्ला झाला. सराईत गुंड दीपक काटे व त्याच्या साथीदारांनी गायकवाड यांच्यावर शाई ओतून काळे फासण्याचा व त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमुद केले आहे की, राज्यातील सत्तारूढ असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचा राज्य सरचिटणीस असणाऱ्या दीपक काटे या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने आपल्या साथीदारांसह प्रवीण गायकवाड यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. त्यामधून प्रवीण गायकवाड बचावले. या हल्ल्याचा सर्वत्र निषेध होत असून रिसोड येथे संभाजी ब्रिगेडने याबाबत राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात जिल्हा कार्याध्यक्ष विनोद पाटील खडसे जिल्हाप्रवक्ता रमेश पाटील सदार संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष रुपेश पाटील बाजड अरुण खडसे प्रशांत खराटे पांडुरंग मंडलिक यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी कार्यकर्ते व सर्व समविचारी संघटनेचे कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते.



# कर्तव्यदक्ष महिला पोलीस प्रमिला निकम राजगड पोलीस स्टेशन यांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन..!!

## महिला पोलीस राजगड पोलीस स्टेशन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**
**(फसव्या लोन अप पासून सावधान)**

आजकाल अनेक फसव्या अप्समुळे लोकांची चांगलीच फसवणूक होत असल्याचे दिसून येत. त्यामुळे अशा अप्सपासून नागरिकांनी सावध आणि सतर्क राहणेचे गरजेचे आहे. असे आवाहन महिला पोलीस हवालदार प्रमिला निकम राजगड पोलीस स्टेशन यांनी केले आहे. सध्या सायबर गुन्हेगार हे सध्या फसव्या अपच्या माध्यमांतून आपला वैयक्तिक डेटा कॉन्टॅक्ट नंबर व पैसे लुबाडतात,असे प्रकार सध्या सर्रास घडताना दिसत आहेत. आणि आजकाल या सायबर फ्रॉडच्या माध्यमांतून लाखो करोडोंचा गंडा घालण्यात हे सायबर फ्रॉड यशस्वी होतात. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत चाललेले आहे. अतिशय चांगले हुद्द्यावरील लोक देखील याला बळी पडताना दिसून येतात. म्हणूनच सायबर फ्रॉडच्या संदर्भात वारंवार घटना घडताना दिसत आहेत.

**(कसे फसवले जाते)**

आपली आर्थिक क्षमता न तपासता



आपल्याला मोठ्या रकमेच्या लोणची ऑफर दिली जाते. एखादी लिंक पाठवून त्यावर क्लिक करण्यात बद्दल सांगितले जाते.
त्यानंतर आपल्या मोबाईल मधील कॉन्टॅक्ट नंबर,फोटो मध्ये अक्सेस मागितला जातो.
मिळालेल्या लोनला भयंकर व्याजदर तसेच छुपे कर आकारले जातात.
लोन चे पैसे भयंकर व्याजासह परत मिळवण्यासाठी तुमचे मोबाईल मधील कॉन्टॅक्ट नंबर ला तुमचे फोटो मॉर्फ करून ते अश्लील बनवून पाठवले जातात.
धमकीचे ऑडिओ कॉल केले जातात.

(काय दक्षता घ्यावी)

अशाप्रकारे कोणतेही कर्जासंबंधी अप डाऊनलोड करताना गुगल प्ले स्टोअर किंवा एप्पल स्टोअर मधूनच डाउनलोड करावे.
अनोळखी लिंक वर कधीही क्लिक करू नये.
कर्ज देणारी संस्था ही आरबीआय च्या लिस्ट मध्ये आहे का ते तपासून पाहावे.
सदर अपमध्ये पॅन, आधार, ओटीपी मागणी केली जाते. असे कोणतेही कागदपत्र ओटीपी पुरवू नये.
जर अशा फसवणुकीला कोणी बळी पडले तर
*CYBERCRIME. GOV. IN या साइटवर जावुन तक्रार करावी.
किंवा 1930 या नंबरचे हेल्पलाइन* वर कॉल करून माहिती द्यावी.
आपला डेटा ही आपली संपत्ती आहे. फसवणूक करणाऱ्यांना चोरण्याची संधी देऊ नका

# गोंदियातील स्वच्छता समस्यांवर आजाद क्रांती सेनेचा उग्र मोर्चा नगर परिषद कार्यालयावर

## नगर परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर; प्रभाग ५, ९, १०, ११ व १२ मधील अस्वच्छतेवर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड प्रतिनिधी.गोंदिया**

गोंदिया शहरातील प्रभाग क्रमांक ५, ९, १०, ११ व १२ मध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली अस्वच्छता, कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांचा अभाव, तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या मनमानी व हलगर्जीपणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आजाद क्रांती सेनेच्या वतीने दिनांक १८ जुलै २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयावर उग्र मोर्चा काढण्यात आला. यावेळी संघटनेने नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. या आंदोलनाबाबत माहिती देताना आजाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष नागेश दुबे यांनी सांगितले की, “दिनांक २ जुलै २०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रशासनाला १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा व कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा तसाच सुरू राहिल्यामुळे



आंदोलनाचे पाऊल उचलले गेले.” नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर समस्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. मुख्यतः बाजार परिसर, शाळांजवळ, रुग्णालय परिसर आणि सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. घंटागाड्या वेळेवर न फिरणे, कर्मचारी कामावर गैरहजर राहणे, अधिकारी वर्गाचे दुर्लक्ष अशा विविध समस्या सातत्याने वाढत चालल्या आहेत. संघटनेने दोषी अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी निवेदनातून केली असून, जर दहा दिवसांच्या आत ठोस पावले उचलली नाहीत, तर आणखी तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनामुळे नगर परिषदेच्या प्रशासनावर दबाव वाढला असून, शहरवासीयांचे लक्ष आता नगर परिषदेच्या पुढील पावलांकडे लागले आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नवी मुंबईत पहिल्यांदाच मायक्रोपेनिसची समस्या असलेल्या २६ वर्षीय तरुणावर यशस्वी उपचार

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल मधील डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई:प्रतिनिधी**

मायक्रोपेनिस ही एक दुर्मिळ जन्मजात स्थिती आहे जी सुमारे २% पुरुषांना प्रभावित करते, जी अंदाजे १०,००,००० पैकी १ मध्ये दिसून येते. हार्मोनल किंवा विकासात्मक समस्यांमुळे, लिंग सामान्य आकारात वाढू शकत नाही, त्याची ताठरता लांबी ३ इंचांपेक्षा कमी असते. नवी मुंबईतील अशाच एका प्रकरणात *मेडिकव्हर हॉस्पिटलचे युरोलॉजिस्ट आणि अँड्रोलॉजिस्ट डॉ. सनीश श्रृंगारपुरे तसेच प्लास्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन डॉ. आशिष सांगवीकर यांच्या नेतृत्वाखाली टिमने मायक्रोपेनिस हा जन्मजात आजार असलेल्या २६ वर्षीय पुरूषावर लिंगाची लांबी वाढविण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आली.

रुग्णाची टेस्टोस्टेरॉनची पातळी खूप कमी होती (१२० एनजी/डीएल) तसेच लहान, अविकसित वृषण आणि उच्च एफएसएच आणि एलएच पातळी होती, जी हार्मोनल असंतुलन आणि वंध्यत्वास कारणीभूत ठरते. त्याला योनीमार्गात प्रवेश करण्यासाठी आणि परिपूर्ण वैवाहिक जीवन जगण्यासाठी लिंगांची लांबी सामान्य हवी होती. मेडिकव्हर येथील डॉक्टरांनी सस्पेन्सरी लिगामेंट रिलीज, व्ही-वाय ॲडव्हान्समेंट प्लास्टी आणि सुप्राप्युबिक लिपोसक्शनचे संयोजन केले. दोन तासांच्या प्रक्रियेच्या अंती रुग्णाच्या लिंगाची लांबी ६ इंचापर्यंत वाढविण्यात यश मिळाले, जी एक उल्लेखनीय शस्त्रक्रिया होती. *अलिबागचा येथे राहणारे श्री नितीन कुमार (नाव बदलले आहे)*,* यांना जन्मजात सूक्ष्म शिश्न आणि अविकसित वृषणाची समस्या होती आणि यामुळे त्यांचा आत्मविश्वास खालावला होता.पण प्रेम करण्याची,




प्रेम मिळवण्याची आणि कधीतरी वडील होण्याची त्याची खोलवर रुजलेली इच्छेमुळे त्याने अखेर वैद्यकिय मदत घेण्याचे ठरविले. आणि त्या धाडसाने, त्याने आपली ओळख आणि प्रतिष्ठा परत मिळवण्याच्या दिशेने पाऊल उचलले. त्याने नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील कुशल डॉक्टरांच्या टीमचा सल्ला घेतला, ज्यांनी त्याला जगण्याची नवीन आशा मिळवून दिली. *डॉ. सनिश श्रृंगारपुरे, युरोलॉजिस्ट आणि अँड्रोलॉजिस्ट, सांगतात की,* हे प्रकरण वैद्यकीय आणि भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक होते. रुग्णाला २.५ इंचाचा मायक्रोपेनिस होता, जो हार्मोनल आणि विकासात्मक समस्यांशी संबंधीत असतो. आम्ही रुग्णाची अनुवांशिक चाचणी आणि हार्मोनल प्रोफाइल तपासली. डॉ. सनीश श्रृंगारपुरे पुढे सांगतात की,* सुरुवातीला लिंगाच्या लांबीवर लक्ष केंद्रित करणे हा आमचा मुख्य उद्देश होता. आम्ही सस्पेन्सरी लिगामेंट सोडले, ज्यामुळे लिंग बाहेर काढण्यास मदत झाली, त्याजागेवरील त्वचा वाढविण्यासाठी व्ही-वाय प्लास्टी जोडली आणि प्रभावी लांबी वाढविण्यासाठी सुप्राप्युबिक लिपोसक्शन केले. परिणामी ६ इंच लांबीची ताठरता प्राप्त झाली जी आमच्या अपेक्षेपेक्षा जास्त होती. ही प्रक्रिया सुमारे ३ तास चालली. शस्त्रक्रियेनंतर ४ दिवसांनी रुग्णाला घरी सोडण्यात आले. या प्रक्रियांबद्दल समाजात अजूनही जागरूकतेचा अभाव आहे. मायक्रोपेनिस ही जन्मजात स्थिती आहे, परंतु शस्त्रक्रियेद्वारे, योनीमार्गात प्रवेश करण्यासाठी आणि समाधानकारक संभोगासाठी पुरेशी लिंगाची लांबी प्रदान करणे शक्य आहे. उपलब्ध उपचारांमुळे रल्सू मायक्रोपेनिस असलेले पुरुषांबरोबरच लिंगाचा आकार सामान्य असलेले पुरुषांकडून देखील या प्रक्रियेविषयी माहिती करुन घेतली जात आहे. जर लहानपणीच या आजाराचे निदान झाले तर हार्मोनल थेरपीद्वारे लिंगाची लांबी सुधारणे शक्य होते. परंतु बहुतेक रुग्ण हे प्रौढावस्थेतच उपचारासाठी येतात त्यामुळे या वयात शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय उपलब्ध असतो. लिंगाची लांबी सुधारण्यासाठी विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया उपलब्ध आहे. लिंगाच्या लांबीमध्ये जास्तीत जास्त वाढ साध्य करण्यासाठी सर्जन वेगवेगळ्या प्रक्रियांचा एकत्रितरित्या वापर करतात. शस्त्रक्रियेनंतर मात्र हे रुग्ण समाधानकारक लैंगिक जीवन जगु शकतात, *अशी प्रतिक्रिया प्लास्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन डॉ. आशिष सांगवीकर यांनी व्यक्त केली. वर्षानुवर्षे, मी ही वेदना शांतपणे सहन केले, मी याबद्दल कोणाशीही जास्त बोलू शकत नव्हतो, अगदी माझ्या पालकांशीही मला यावर चर्चा करता येत नव्हती. दिवसेंदिवस माझा आत्मविश्वास खालावत चालला होता. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन व अचुक उपचारांनी मला जगण्याची नवी आशा मिळवून दिली अशी प्रतिक्रिया रुग्णाने व्यक्त केली. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अत्याधुनिक उपचार पध्दती व उपकरणं उपलब्ध आहेत. याठिकाणी असलेली तज्ञ डॉक्टरांची टीम, निदानाची प्रगत साधनं आणि चोवीस तास क्रिटिकल केअर सपोर्टच्या माध्यमातून उत्तमोत्तम रुग्णसेवा पुरविण्याचा आम्ही पुरेपुर प्रयत्न करतो *अशी प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी व्यक्त केली.*

## काशीद-मुंबई रो-रो सेवा रखडली; पाच वर्षांत केवळ 12 टक्के काम, पर्यटक व स्थानिकांची मोठी गैरसोय




**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

मुरुड तालुक्यातील काशीद समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन वाढ आणि प्रवाशांचा प्रवास वेळ कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेली मुंबई ते काशीद रो-रो सेवा अद्यापही प्रतिक्षेत असून, पाच वर्षांनंतरही केवळ १२ टक्के कामच पूर्ण झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डमार्फत सागरमाला योजनेअंतर्गत ११२ कोटींचा प्रकल्प हाती घेण्यात आला असला, तरी ठेकेदाराच्या संथ कारभारामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प रखडला आहे.काशीद समुद्रकिनारा हा पर्यटकांचा आवडता ठिकाण असून, दरवर्षी दोन लाखांहून अधिक पर्यटक येथे भेट देतात. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिकसह देश-विदेशातून पर्यटक येथे गर्दी करतात. मात्र, सध्या मुंबईहून मांडवा-आलिबाग मार्गे काशीदला पोहोचण्यासाठी सुमारे तीन तास लागतात. परिणामी, प्रवासाचा वेळ वाढल्याने पर्यटकांना काशीदचा अनुभव घेण्यासाठी वेळ अपुरा पडतो. हा त्रास कमी करण्यासाठी जलमार्गाने थेट मुंबई ते काशीद सेवा सुरू करण्याची योजना आखण्यात आली होती.

२०१८ मध्ये या प्रकल्पाची सुरुवात झाली. यामध्ये रो-रो जेट्टी, प्रवासी टर्मिनल, ब्रेक वॉटर अशा अत्यावश्यक संरचना उभारण्याचे नियोजन आहे. आतापर्यंत ९९.१६ कोटी रुपयांचा खर्च झाला असला, तरी कामाचा वेग अत्यंत संथ असून, केवळ १२ टक्केच काम पूर्ण झाले आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे ही परिस्थिती ओढवली असून, मेरीटाईम बोर्डाने संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे.

रो-रो सेवा सुरू झाल्यास केवळ दोन तासांत मुंबईहून काशीदला पोहोचता येणार आहे. त्यामुळे पर्यटकांसह काशीद, मुरुड, दिघी, उसरोली, मजगाव येथील मुंबईतील चाकरमान्यांसाठी देखील ही सेवा अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. सध्या या भागातील नागरिकांना अनेक वाहने बदलून मुंबईला प्रवास करावा लागतो, त्यामुळे वेळ आणि पैसे यांची नासाडी होते.स्थानिक व प्रवासी वर्गाकडून या प्रकल्पाची लवकरात लवकर पूर्तता व्हावी, अशी जोरदार मागणी होत आहे. काशीदचा पर्यटन विकास आणि स्थानिक रोजगाराला चालना देणाऱ्या या सेवेला वेळेवर मूर्त स्वरूप मिळाले, तर ही सेवा कोकणच्या प्रगतीचा एक नवा अध्याय ठरू शकतो.

## जालना शहरातील चंदनझिरा प्रभागात येथे आजपासून होणार अंखड हरिनाम सप्ताहस सुरुवात !

**दैनिक युवक आधार**
**जालना जिल्हा प्रतिनिधी (शहर). संतोष रासवे**

**चंदनझिरा-** श्री संत सावता महाराज यांच्या 730 व्या संजीवनी सोहळ्यानिमित्त जालना शहरातील चंदनझिरा येथील श्री हनुमान मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले एकोणावीस जुलैपासून या सप्त्याला सुरुवात होणार आहे या सप्ताह त्निमित्त संध्याकाळी हरिपाठ हरिपाठ होणार आहे तसेच श्री सतीश महाराज यांच्या सुमधुर वाणीतून श्री संत सावता महाराज गाथा वाचन होणार आहे दररोज सायंकाळी 8 ते 9;15 पर्यंत वाचन होणार आहे 21 जुलै रोजी ह भ प श्री सुनील महाराज गवारे यांचे कीर्तन 22 जुलै रोजी ह भ प श्री दत्तात्रय महाराज अंकुश कर तसेच 23 जुलै रोजी ह भ प श्री माऊली महाराज पुंगळकर यांचे हरिकीर्तन होणार आहे या धार्मिक कार्यक्रमाचा समस्त गावकरी मंडळी लाभ घ्यावा असे आवाहन माळी महासंघ जालना जय बजरंग मित्र मंडळ सिद्धिविनायक मित्र मंडळ संत रोहिदास मित्र मंडळ स्वर्गीय अशोक पवार मित्र मंडळ स्वराज्य ग्रुप मित्र मंडळ श्री चंदन श्वेर मित्र मंडळ श्री विठ्ठल नगर मित्र मंडळ क्रांतीसुर्य महात्मा फुले प्रतिष्ठान चंदनझीरा नागोडी समस्त गावकरी यांनी आव्हान केले आहे*




## RE: आमसरीतील "नांद्रुकच्या "मातृ वृक्षाने गावाला बनवले "ऑक्सिजन हब ".

### मराठवाड्यात आमसरी सह"वन्य"नांद्रुक तीनच ठिकाणी

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर -**

संत श्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांचे देहू हे जन्मस्थान.इंद्रायणी नदी काठी असलेल्या या गावी नांद्रुक वृक्ष मोठया प्रमाणात पूर्वापार असून या वृक्षाच्या सानिध्यात संत तुकाराम महाराज यांनी अनेक अभंग रचना केल्या, आयुष्य व्यतीत केले. या च नांद्रुक वृक्षावरून ते वैकुंठास गेले. दरवर्षी तुकाराम बीजे च्या दिवशी देहू येथे मोठा सोहळा असतो, लाखो भाविक येथे जमतात व स्थळ- काळ ऊर्जेने दुपारी 12 वाजून 2 मिनिटांनी हा दैवी व पाचशे वर्षांहुन अधिक वयाचा हा नांद्रक वृक्ष जोरात सळसळतो. हा वृक्ष नैसर्गिक रित्या उगम झालेला फार कमी आढळतो. अनेक मंदिर, बगीचे, प्रकल्प यात तो रोपण केले जातो. याआधी वन्य अवस्थेत तो मराठवाडयात विविध अभ्यासकांना तो फक्त लातूर जिल्ह्यात आढळला



होता मात्र सिल्लोड येथील पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांना तो तालुक्यात आमसरी व रहीमाबाद येथे वन्य आढळून आला आहे व पी. बी. आर. मध्ये नोंद केला आहे.

अपघाताने झाली नोंद ---- डॉ. पाटील हे काही दिवसापूर्वी आमसरीच्या डोंगरात जातं असतांना गावात बऱ्याच जणांच्या घरा समोर, रस्त्याच्या दुतर्फा, गोठ्याजवळ नांद्रुक चे 30 ते 60 वर्षे वयाचे अनेक वृक्ष दिसले. गावाकऱ्यांना इतके रोपं कुठून व का लावली हा प्रश्न विचारल्यावर उपस्थितांनी रंजक माहिती दिली. ती

दोन झाड व मठाधीश यांची प्रेरणा- या गावात नांद्रुक वृक्षास फक्त सावलीचे झाड म्हणून रोपण केले गेले. येथे 100 वर्षांपूर्वी ही 2 झाडे ही निसर्ग रित्या पक्षांच्या मार्फत बीज प्रसार होऊन उगलेली होती. देवस्थानचे संत तुकाराम बाबा सुरडकर यांनी गावाकऱ्यांना सावली साठी या झाडाच्या फांदया लावायला प्रेरित केले व पन्नास वर्षां पूर्वी सुरु झालेले हे या झाडाचे रोपण गावास "ऑक्सिजन हब " बनवून गेली. या छोट्याशा गावात 22 ठिकाणी आज 30 ते 60 वर्षे वयाचे हे वृक्ष आहेत

**गावाकरी देतात पाहुण्यांना वाण-**
या गावी घरी कोणी पाहुणा आला कि त्याला सावलीचे झाड लावावे असा आग्रह धरून 3 फुटाची फांदी रोपणासाठी दिली जाते असे शेकडो वृक्ष नातेवाईक ही जोपसत आहेत.येथील एक स्टंप आसडी येथे 40 वर्षे पूर्वी रोपण केले व त्यापासून आसडी हि 25 हुन अधिक झाडे निर्माण झाली. एका मातृ वृक्षा पासुन शेकडो नांद्रुक वाढीस लागले.

2 मातृवृक्षा पैकी एक वृक्ष वठला आहे व दुसऱ्या झाडाची ही बरीच पडझड झाली आहे. त्याचे संवर्धन गावकरी व डॉ. पाटील करत असून, पाटील यांनी नुकतेच या गावातील सुस्थितीत असणाऱ्या झाडांचे रोपणायोग्य 40 फांदया- स्टंप काढून ( स्टेम प्रोपोगेशन ) जिल्ह्यात विविध मंदिर व शाळांत या सप्ताहात रोपन केले आहे व गावाकऱ्यांना संत तुकारामांचे नाते विषद करून आता गाव हा अध्यात्मिक वारसा जपत आहे.

*नांद्रुक निसर्गाचा ए. सी.*-- हा वृक्ष दिवसातून 18 ते 20 तास ऑक्सिजन उत्सर्जित रणारा असून हे एक झाड रोज सरासरी 275 लिटर प्राणवायू निर्माण करते त्या अर्थी हे 22 वृक्ष रोज सहा ते सात हजार लिटर ऑक्सिजन निर्माण करतात शिवाय हे एक झाड वार्षिक 40 किलो कार्बन डाय ऑक्साईड वायू शोषून वर्षाला ही झाडे 1100 किलो कार्बन शोषून जागतीक तापमान वाढ व प्रदूषण घटवण्यास हातभार लावतात.अनेक पक्षांचा यावर अधिवास असून, अजूनही गावाबाहेरील एका वृक्षावर घुबड रात्री बऱ्याचदा दिसते असे वयस्क असणारे फकीरबा जाधव यांनी सांगितलं.

## विचार साधना

माणसाचे जीवन जगणे हे काळानुसार चालू असते. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ.. माणूस भूतकाळात घडलेल्या घटनांचा पुन्हा पुन्हा विचार करून त्या आठवणीत रमणारा आहे. गत स्मृतीच्या हिंदोळ्यावर बसावे. आनंदाने हिंदोळे घ्यावेत आणि त्या स्मृती पटलावर आनंदाने पूर्वी घडलेल्या घटनांचा क्रम लावून सुखाचे क्षण पुन्हा वेचावेत, अथवा दुःख काय होते याचा विचार करावा. असा हा भूतकाळ प्रत्येक जणालाच आठवत असतो. वर्तमान काळात आपण सद्यस्थितीचे जीवन जगत असतो. जीवन जगणं आणि जीवन आनंदाचं जगणं, मनाप्रमाणे जगणं या तिन्ही वाक्यांमध्ये खूप फरक आहे. जीवन जगताना अपार हाल कष्ट सोसावे लागतात. या छोट्याशा टिचभर पोटाला अन्न मिळण्यासाठी आपल्याला खूप कष्ट करावे लागतात. आपल्या ज्या भौतिक गरजा आहेत अन्न वस्त्र निवारा या मिळवण्यासाठी सुद्धा खूप धडपड करावी लागते. त्याला आपण जीवन जगणं असं म्हणूयात. जीवन आनंदात जगणं याचा अर्थ काय तर आपण आज ज्या अन्न वस्त्र निवारातर आहेतच पण त्या सोडून ज्या भौतिक सुविधा आनंदाने उपभोगत आहोत याला आपण आनंदाने जीवन जगणं असं म्हणूया. यामध्ये बंगला,गाडी आपल्याला हवं ते आपल्याला करता येतं आणि काही गोष्टी आपल्या मनासारख्या होत नाहीत पण जीवन आनंदात चाललेल असतं.

समाजात एक स्थान निर्माण झालेला असतं. आपल्या कुटुंबामध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण झालेली असते.कर्ता पुरुष, स्त्री असा आदर मिळतो. याचा अर्थ काय तर काही स्वप्न अपुरी जरी राहिली तरी पण जीवन आनंदात चालू असतं. मजेत चालू असत. जीवन मनाप्रमाणे जगता येतं. यासाठी आपल्याला काय खूप पैशांची गरज नसते. यामध्ये अशी लोक येतात की खूप श्रीमंत लोक असतात आणि ह्या श्रीमंत लोकांनी ज्या वस्तूवर हात ठेवला ती वस्तू त्यांना ती मिळवता येते म्हणजे ते मनाप्रमाणे स्वतःचे आयुष्य जगू शकतात. यामध्ये अशी माणसे येतात की त्यांच्या संकल्पना म्हणा किंवा स्वप्न म्हणा खूप उंची नसतात त्यांची धाव जेवढी आहे तेवढं त्यांना ते मिळवायचं असतं त्यांच्या स्वप्नांपर्यंत पोहोचायचं असतं उद्दिष्ट जीवनातली पूर्ण करायची असतात ती ते पूर्ण करतात आणि स्वतःच्या जीवनाचं सार्थक करून मनाप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करतात. वर्तमानात जगून घेतात भूतकाळाचा विचार करतात आणि भविष्यकाळाची तरतूद करतात. भविष्य काळामध्ये आपण आजारी पडलो तर आपल्याला पैशांची गरज आहे. आज वन आर के आहे परंतु नंतर आपल्याला मुलं बाळ झाल्यानंतर टू बीएचके लागणार आहे याची तरतूद करून ठेवतात. आजारपणात लागणाऱ्या पैशांची तरतूद करून ठेवतात. एकंदरीत काय तर भविष्यामध्ये येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी आर्थिक अडचण आता सहन करतील परंतु भविष्यकाळाची तरतूद करून ठेवतील. हा मानवी स्वभावच आहे. आणि तशी तरतूद केली नाही तर आपली मुलं बाळ आपल्याला सांभाळतील किंवा कोणी आपल्याकडे बघेल ही आशा तर दूरच राहिली. म्हणून मानव हा आपल्या भविष्यकाळाची सुद्धा तरतूद करून ठेवतो काही लोक अशी आहेत की आपण मेल्यानंतर आपल्या क्रियाकर्मासाठी सुद्धा पैशांची तरतूद करून ठेवतात मुलांवर त्याचा भार टाकत नाहीत. उत्तम जीवन जगायचे असेल तर, भूतकाळात रममान होऊ नये, वर्तमान काळाचा आनंद घ्यावा आणि जीवन आनंदाने जगावे. भविष्यकाळाचे तरतूद थोडीफार तरी करून ठेवावी. जीवनी आलो तर आनंदाची बाग फुलवावी, त्या आनंदाच्या बागेत सुखाची रोपे लावावीत. त्या रोपाला आलेल्या फुलांना मस्त कविता घ्यावे व हर्षात जीवन जगावे.

**वसुधा वैभव नाईक**
**धनकवडी, जिल्हा- पुणे**

## यावर्षी तरी मुंबई- गोवा महामार्गावर खड्डे मुक्त करून कोकणवासी गणेश भक्तांना गणपती बाप्पा पावणार का?

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

गेली १८ वर्षे झाले मुंबई गोवा महामार्गावर रस्त्याचे काम चालू आहे. तरीही अजूनही काम अपूर्ण आहे. या या रस्त्यावर दरवर्षी अनेक ठिकाणी अनेक वेळा अपघात घडतात.निष्पाप नागरिकांना आपला जीव गमावा लागला आहे. कित्येक वर्षापासून अनेक राजकीय नेत्यांच्या या रस्त्याची पाहणी झालेली आहे पण अद्याप या रस्त्याचे काम अपूर्णच आहे. पेन ते महाड या मार्गावर एकूण ३९ डेंजर झोन आहेत. गणपती बाप्पाच्या आगमन केवळ ४० दिवसावर येऊन ठेपले आहे. या महामार्गावरील खड्ड्यामुळेच कोकणवासीयांना आजपर्यंत गणेशोत्सवाला जाताना अशा बिकट परिस्थितीला सामना करावा लागत आहे. गोवा मार्गाच्या ९५ किलोमीटर अंतरावरील या ३९ डेंजर स्पॉटमध्ये चार अपूर्ण फुल, १२ सर्विस रोड आठ अंडरपास या महत्त्वाच्या कामाचा समावेश आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांना कामे पूर्ण करण्याचा कालावधी दिला आहे पण ही कामे



पूर्ण होतील का ? याची शंका कंत्राटदार यांनी खाजगीत बोलताना दिसत आहे. फक्त गणेशोत्सव, दिवाळी , होळी अशा प्रकारचे सण उत्सव आले की प्रशासनाला जाग येते व प्रशासकीय अधिकारी कामाला लागतात. केवळ ५ ते ६ तासात प्रवास करताना लागणारा वेळ आता ९ ते १० तास लागतो आहे. महाराष्ट्रातील मोटर वाहन विभाग वाहनांच्या वर वाहन कर दर किमान १० टक्के व जास्तीत जास्त २० टक्के शुल्क आकारते व पंधरा वर्षानंतर वाहन कर भरून परत वापरण्याची परवानगी देते पण गेली १८ वर्षे महामार्गावर वाहन चालकांना कर भरून सुद्धा अशा बिकट रस्त्यामध्ये वाहने चालवावी लागत आहेत. याला जबाबदार कोण? जर रस्ता अपूर्णच आहे तर महाराष्ट्र शासन वाहन कर कसा काय घेते? याची खंत वाहन मालकांमध्ये दिसत आहे. कोकणवासी यांची *रोज मरे त्याला कोण रडे* अशी अवस्था झाली आहे. गणेशोत्सवावेळी या महामार्गावर तासंतास वाहनांची गर्दी असते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोकणवासी गणेश भक्त आपल्या गावाकडे गणेशोत्सवासाठी जाण्याची वाट पाहत आहेत. महामार्गावरील या रस्त्यांची दुरावस्था पाहून गणेश भक्तांच्या मनात द्विधा अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे गणपती बाप्पा *यावर्षी तरी तुझ्या दर्शनाला सुखा समाधानाने येऊ दे* अशी अंतर्मनाणे गणेश भक्त हाक मारताना दिसत आहेत.

## केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करणार- केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.प्रतिनिधी**

केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या (CGHS) दरांमध्ये सुधारणा करण्याची बाब केंद्र सरकारच्या विचाराधीन असून लवकरच त्यात सुधारणा केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री श्री. मांडविया यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. राज्यातील कामगार रुग्णालयामध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असुन राज्यातील कामगार रुग्णालयासंबंधीत प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक व्हावी, अशी मागणी आरोग्यमंत्री श्री.आबिटकरांनी यावेळी केली. राज्यात कामगार विमा सोसायटीची पंधरा रुग्णालये असुन योजनेची संलग्नित असलेल्या 450 खाजगी रुग्णालये व 134 सेवा दवाखान्याच्या माध्यमातून कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. राज्यात सद्यस्थितीत 48 लाख 70 हजार 460 विमाधारक कामगार असुन, कामगार व त्यांचे कुटुंबीय मिळून सुमारे दोन कोटी नागरिक विमा योजनेचा लाभ घेतात. केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री यांच्या भेटीत उल्हासनगर, अंधेरी, कोल्हापूर येथील बांधकामांची सद्यस्थिती, विविध ठिकाणी सुरू असलेल्या रुग्णसेवा बाबतची चर्चा झाली. कामगार व त्यांचे कुटूंबियांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी राज्याला अधिक निधी देण्याची विनंती आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी केली. सद्यस्थितीत 21,000 हजार रुपये मासिक उत्पन्न असलेल्या कामगारांना विमा योजनेचा लाभ घेता येतो. ही उत्पन्न मर्यादा 30,000हजार रुपये पर्यंत वाढवण्याची मागणी यावेळी केली. उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यास विमाधारक कर्मचाऱ्यांची संख्याही वाढेल तसेच अनेक कामगारांना या योजनेचा लाभ घेता येईल, असेही मंत्री श्री.आबिटकर यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले. केंद्रीय मंत्री श्री. मांडविया यांनी वरील सर्व प्रश्नांच्या सोडवणुकी बाबतीत सकारात्मक चर्चा केली. तसेच राज्याचे आरोग्य मंत्री यांचे समवेत मुंबईतील अंधेरी येथील ईएसआयएस (ESIS) रुग्णालयास संयुक्त भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितले आहे. राज्यातील सर्व ईएसआयसी (ESIC) रुग्णालयांबाबत एक सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी दिल्या. अंधेरी, कोल्हापूर आणि उल्हासनगर येथील ईएसआयसी (ESIC) रुग्णालयांची प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून ती कार्यान्वित करण्यासाठी ईएसआयसी महासंचालकांना सूचना देण्यात येतील, तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथील ईएसआयसी रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्याबाबतही विचार केला जाईल, असे डॉ.मांडविया यांनी सांगितले. या भेटीमुळे महाराष्ट्रातील ईएसआयसी ESIC आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणाला गती मिळेल आणि विमाधारक कर्मचाऱ्यांसाठी उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या भेटीबाबत सांगितले. या भेटीच्या वेळी आरोग्य सचिव श्री.वीरेंद्र सिंग, ESIC चे आयुक्त श्री.रमेश चव्हाण व इतर अधिकारी उपस्थित होते.

## दु:खत घटना



कै. सौ. रेणुका बाई नामदेव लोखंडे रा. बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक १६ / ७/२०२५ रोजी बुधवारी सकाळी १० वाजता घाटी रुग्णालयात उपचार चालू असताना अचानक दुःखत निधन झाले. त्यांच्या पश्चात पती एक मुलगा सून, तीन मुली जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांच्या अल्पावधीत जाण्याने लोखंडे परीवारावर फार मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हया दुःखातून लवकरात लवकर सावरण्यात यावा हिच ईश्वरचरणी प्रार्थना आहे.

## महावितरणची अजब प्रकारची गजब कहाणी

### मीटर न बसवता ग्राहकाला पाठवले वीज बिल

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

**घाटंजी:-** तालुक्यातील तरोडा येथील रहिवासी वैशाली उमेश नडपेलवार या ग्राहकाने महावितरणच्या अजबगजब कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आपल्या नव्या घरासाठी नियमानुसार मीटरचे शुल्क भरले असूनही, आजतागायत त्यांच्या घरी वीज मीटर बसवण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे, मीटर नसताना देखील महावितरणकडून नियमितपणे वीज बिल पाठवले जात असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. हे वागणे चुकीचे असून, ग्राहकांच्या हक्कांवर अन्याय करणारे आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नडपेलवार यांनी दिली. या प्रकाराविरोधात त्यांनी घाटंजी महावितरण कार्यालय येथे लेखी तक्रार सादर केली आहे. त्यांनी या तक्रारीत मीटर त्वरित बसवण्याची आणि मीटर न बसवता पाठवलेले वीज बिल रद्द करण्याची मागणी केली आहे. ग्राहकांच्या तक्रारीकडे महावितरण प्रशासन काय पावले उचलते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. अशा अकार्यक्षमतेमुळे सामान्य नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असून, महावितरणने याची गांभीर्याने दखल घेणे अत्यावश्यक आहे.

## पनवेल रेल्वे स्थानकावर ३५ कोटींच्या ड्रग्ससह दोघे ताब्यात

### मंगला एक्स्प्रेसमधून अमली पदार्थ नियंत्रण विभागाची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर):** पनवेल रेल्वे स्थानकावर आज सकाळी एक मोठा धक्का देणारा प्रकार उघडकीस आला. मंगला एक्स्प्रेसने प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांकडून तब्बल ३.५ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अमली पदार्थ नियंत्रण विभागाच्या (NCB) पथकाने गोपनीय माहितीनंतर ही धाडसी कारवाई केली. विशेष म्हणजे हे ड्रग्स खाण्याच्या पुड्यांमध्ये लपवून नेले जात होते. परंतु अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे ही खेप हुलकावणी देऊ शकली नाही. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची अंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ३५ कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. सध्या हे ड्रग्स रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात आले असून, संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेले दोघे कोणत्या टोळीचे सदस्य आहेत का?, त्यांच्या मागे कोण आहेत? याचा शोध NCB व रेल्वे पोलिसांनी सुरू केला आहे. पनवेलसारख्या महत्त्वाच्या स्थानकावर इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ सापडणे ही बाब सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर मानली जात आहे. या कारवाईमुळे शहरातील ड्रग्ज रॅकेटचा मोठा तपशील बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तपास यंत्रणा आता ड्रग्स नेटवर्कचा मुळापासून शोध घेण्याच्या तयारीत आहेत. या कारवाईमुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की, रेल्वेमार्गांचा वापर ड्रग्स वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर केला जात असून, अशा मार्गांवर चौकशी अधिक कडक करण्याची गरज आहे.

# सरपंच पद महिलांकरिता राखीव ४७ पैकी २५ महीला सरपंच आरक्षण सोडत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे**



**राळेगाव:-** तालुक्यातील ४७ ग्रामपंचायती करिता नव्याने काढण्यात आलेल्या सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडली असून,सरपंच पदाच्या आरक्षण सोडतील ४७ ग्रामपंचायती पैकी २५ ग्रामपंचायती महिला करिता राखीव ठरल्या आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील तहसीलदार अमित भोईटे,निवासी नायब तहसीलदार नरेंद्र हलामी तथा निवडणूक विभागीय अधिकारी कर्मचारी या आरक्षण सोडतील दरम्यान उपस्थित होते .या आरक्षण सोडतील ४७ ग्रामपंचायती पैकी अनुसूचित जाती महिला २,अनुसूचित जाती १,अनुसूचित जमाती महिला ४,अनुसूचित जमाती ३,तर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ७,नागरिकांचा मागास प्रवर्ग ६,तर सर्वसाधारण महिला १२,तर सर्वसाधारण १२,अशा पद्धतीचे एकूण ४७ ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत काढण्यात आली आहे यामध्ये वडकी अनुसूचित जाती महिला, वनोजा अनुसूचित जाती, रावेरी अनुसूचित जाती महिला, शेळी अनुसूचित जमाती महिला, वालधूर अनुसूचित जमाती, टाकळी अनुसूचित जमाती ,किन्ही (जवादे) वाऱ्हा अनुसूचित जमाती महिला,करंजी (सो) अनुसूचित जमाती महिला,सावंगी पेरका अनुसूचित जमाती,आष्टा नागरिकांचा मागास प्रवर्ग,कारेगाव नागरिकांचा मागास प्रवर्ग,बोरीइचोड नागरिकांचा मागास प्रवर्ग,कळमनेर नागरिकांचा मागास प्रवर्ग, झाडगाव नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,अंतरगाव नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, चिखली (व ) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,पिंपरी (सा) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,श्रीरामपूर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, मंगी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,धानोरा नागरिकांचा मागास प्रवर्ग,भीमसेन्पूर नागरिकांचा मागास प्रवर्ग,उंदरी नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,आष्टोना सर्वसाधारण,भांब सर्वसाधारण,चहांद सर्वसाधारण, दहेगाव सर्वसाधारण महिला,धुमक चाचोरा सर्वसाधारण,गुजरी सर्वसाधारण महिला,खडकी सर्वसाधारण महिला,खैरी सर्वसाधारण,मेंगापूर सर्वसाधारण महिला,निधा सर्वसाधारण,नागठाणा सर्वसाधारण महिला,पिंपळापूर सर्वसाधारण,पिंपळखुटी सर्वसाधारण,रिधोरा सर्वसाधारण,रामतीर्थ सर्वसाधारण महिला,सरई सर्वसाधारण, वाढोणाबाजार सर्वसाधारण महिला, वेडसी सर्वसाधारण,येवती सर्वसाधारण महिला,झुलर सर्वसाधारण महिला,सावनेर सर्वसाधारण,पिंपळगाव सर्वसाधारण महिला,जागजई सर्वसाधारण महिला,बंदर सर्वसाधारण महिला, याप्रमाणे सर्व आरक्षण सोडत काढण्यात आली आहे,यावेळी तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते

## भारतीय जनता महिला मोर्चा प्रदेश सचिव मा. डॉ. स्वाती दीपक पाटील यांची महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य पदी निवड



दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर

महाराष्ट्र राज्य भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव डॉ.सौ. स्वाती दिपक पाटील MS. PHD.यांची भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र राज्य परिषदेच्या सदस्य पदी निवड झालेबद्दल संकल्प महिला मजूर बांधकाम कामगार संघटना व राजमाता बहुउद्देशीय महिला मजूर सेवाभावी संस्था, मलकापूर.वैष्णवी महीला बचत गट रयत शिक्षण संस्था सखी सावित्री समीती सदस्य मलकापूर तसेच सर्व पदाधिकारी मंडळींच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाहूवाडी व पन्हाळा या लहान तालुक्यांतून भाजपाच्या महाराष्ट्र राज्य परिषद सदस्यपदी एक महिलेची निवड होणे, हा आमच्यासारख्या सर्व महिलांसाठी गौरवाचा व अभिमानाचा क्षण आहे आज तळागाळातील लोकांपर्यंत त्या पोहचल्या आहेत आणि असं व्यक्तिमत्त्व आपल्या तालुक्याला लाभलयं शाहूवाडी पन्हाळा तालुक्यातुन पहील्यांदाच एक महीला समाजकार्यासाठी पूढे येत आहे याचा आम्हां महीलांना सार्थ अभिमान आहे .असे वक्तव्य माधुरी देसाई यांनी व्यक्त केले..

यावेळी संघटनेच्या अध्यक्षा माधूरी देसाई. संघटना व संस्थेच्या पदाधिकारी सौ दिपाली कापसे.सौ तेजस्विनी जगताप. सौ सुनिता कापसे. सौ सरीता कांबळे. शाखाध्यक्ष उपस्थित होत्या

## पोलिसांच्या तत्परतेने पाच तासातच मोटारसायकल चोर पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



विंचूर :- येथे घरासमोर उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लॉक तोडून चोरून नेली, मात्र लासलगाव पोलिसांनी तत्परता दाखवत सूत्र हलविल्याने अवघ्या पाचच तासात मोटारसायकल सह आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. दि.१६ जुलै रोजी रात्री ९.३० ते १७ जुलैच्या सकाळी ८ वाजेच्या दरम्यान मेघन दिगंबर ताम्हाणे यांच्या मालकीची काळ्या रंगाची हिरो एच.एफ. डिलक्स ही मोटारसायकल व वाकद येथील आकाश दीपक आहेर यांच्या मालकीची हिरो स्प्लेंडर अंदाजे किंमत एकूण ४५ हजार रुपयांच्या दोन मोटारसायकली घरासमोरून चोरीस गेल्या. याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी स.पो. नि.भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सूत्र हलवत नाकाबंदी केली. तपासा दरम्यान पो.ना.औदुंबर मुरडनर यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, सागर भाऊराव बर्डे (वय ३२, रा. देर्डे, ता. कोपरगाव या संशयितास ताब्यात घेण्यात आले. त्यास विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्याने गुन्ह्यातील एच.एफ डिलक्स मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करून कायदेशीर अटकेची कारवाई करण्यात आली. सदर मोटारसायकल चोर हा सराईत आहे किंवा नाही, त्याच्याकडे अधिक मुद्देमाल मिळून येतो का? याबाबत स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ना.औदुंबर मुरडनर व संदीप शिंदे अधिक तपास करीत आहेत.

## धर्माबादेत भिषण अपघाताची मालिका सुरुच, 30 महिन्यात 59 अपघात

### (अतिवेगाने घेतला जीव; 37 जणांचा मृत्यू, अनेकांना आले अपंगत्व)

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :**
**गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद शहरासह तालुक्यातील रस्त्यांची स्थिती अलीकडे सुधारली असून, या मार्गाचे आता राष्ट्रीय महामार्गामध्ये रूपांतर झाले आहे. परिणामी वाहनांचा वेगही वाढला आहे. अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अतिवेगामुळे अनेकांना आपला जीव गमावण्याची वेळ आली तर अनेकांवर कायमचे अपंगत्व आले आहे.

| वर्ष | | अपघात | | मृत्यू |
|---|---|---|---|---|
| 2023 | - | 13 | - | 09 |
| 2024 | - | 29 | - | 18 |
| 2025 | जुलै | 17 | - | 10 |



जन्मभूमी ते कर्मभूमी या राष्ट्रीय महामार्गावर उमरी ते येताळा मार्ग धर्माबाद, कंदाकुर्ती या राष्ट्रिय महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघाताच्या घटना घडत आहेत. नांदेड, बळेगाव मार्ग कारेगाव ते धर्माबाद मार्ग बासर या सिमेंट मार्गावरही अशीच स्थिती आहे. तसेच बिलोली, कुंडलवाडी मार्ग धर्माबाद ते बिद्राळी मार्ग बासर या रस्त्यावरही अपघाताचे प्रमाण वाढले आहे. कारेगाव ते धर्माबाद सिमेंट रस्त्यावर चिकना फाटा येथे दुचाकी व बसचा अपघात होऊन बस रस्त्याच्या कडेला खड्डयात पलटी झाल्याने शाळकरी मुलांसह १२ जण जखमी झाले होते तर दुचाकीस्वाराचा दवाखान्यात नेताना म्रुत्यु झाला. तालुक्यातील या विविध मार्गांवर अपघात वाढले आहेत.

महामार्गावर वाहन चालविताना नियमांचे पालन करणे अधिक गरजेचे आहे. वेगावर नियंत्रण ठेवणे, ओव्हरस्पीडमध्ये वाहन न चालविणे हेही महत्त्वाचे आहे. अपघात टाळण्यासाठी वाहन चालविताना काळजी घ्यावी".
**- सदाशिव भडीकर, पोलीस निरीक्षक धर्माबाद.**

**अतिवेग अपघाताचे मुख्य कारण**
अतिवेग अपघाताचे मुख्य कारण आहे. बेशिस्तपणे वाहतुकीच्या नियमांचे पालन न करण्यामुळेही अपघात घडत आहेत. धर्माबाद तालुक्यातील वेगवेगळ्या मार्गावर या अडीच वर्षात 59 अपघात झाले असून 37 जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती हवालदार पंडित जोंधळे यांनी दिली.

## मरणयातना स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा नंतरही दख्खन पूर्व धनगरवाडी अंधारातच

### मी हयात असेपर्यंत तरी वीज घरी पोहचेल का? वृध्देचा शासनाला उद्वीग्न सवाल
### सध्याच्या पिढीला सोयीअभावी भोगाव्या लागताहेत मरणयातना

**दैनिक युवक आधार**
**कोकण (शांताराम गुडेकर)**

आंबा घाटातील एका दरीत वसलेली संगमेश्वर तालुक्यातील दख्खन धनगरवाडी पूर्व ९ कुटुंब असलेली लोकवस्ती. मात्र जागेअभावी वस्तीपर्यंत रस्ता पोहचला नाही परिणामी महावितरणला परवडत नाही म्हणून वीज नाही. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा नंतरही दख्खन पूर्व धनगरवाडी अंधारातच आहे.

नागरी सुविधा पासून वंचित असल्याने तात्पुरत्या स्वरूपात अनेक कुटुंबे स्वतःच घर-दार शिवार सोडून स्थलांतरीत झाली आहेत. मात्र परिस्थिती अभावी इथल्याच मातीत रहाणं भाग पडलेलं कुटुंब आदिवासी जीवन जगत आहेत. आंबा घाटातील कळकदरा स्टॉपच्या पश्चिमेला एका खोल दरीत धनगरवाडी पूर्व गावची लोकवस्ती आहे. धनगर बांधवांचा शेती आणि पशुपालन हा प्रमुख व्यवसाय असल्याने जनावरांना पुरेसा चारा मिळावा यासाठी पूर्वजांनी या ठिकाणाची निवड केली. मात्र सध्याच्या पिढीला सोयीअभावी मरणयातना भोगाव्या लागत आहेत. वस्तीत वीजपुरवठा व्हावा यासाठी रीतसर मागणी आणि ७ कुटुंबांनी वीज मीटरची २०१७ साली देयक भरणा केले. मात्र या प्रकारास आठ वर्षे उलटून गेली तरी अंमलबजावणीचा पत्ता नाही. लोकशाही दिनात सुद्धा या विषयावर आवाज उठविण्यात आला होता. मागील वर्षी देवरूख येथे झालेल्या जनता दरबारात गावचे पोलीस पाटील रविंद्र फोंडे यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर



महावितरणची टीम घटनास्थळी भेट देऊन केवळ पाहणी करून गेली. आधुनिक युगात वीजे शिवाय पर्याय नाही. मात्र या वाडीतील नवीन पिढीतील कुटुंबांना विजेच्या सोयी अभावी एक एक करत घरं दारं शेत शिवार मनाविरूद्ध सोडावं लागलं. मात्र परिस्थिती अभावी ९० वर्षाची वृद्धा, तिचा मुलगा, सुन आणि तीन सहा वर्षाखालील नातवंडे असे ६ जण प्रतिकूल परिस्थिती वर मात करत हलाखीचे जीवन जगत आहेत. सभोवती घनदाट जंगल, बिबटे, रान रेडे, कोल्हे, कोळसुंदे अशी हिंस्त्र श्वापदे यांचा मुक्त वावर त्यातच रात्रभर पूर्ण अंधार. अशा भयावह परिस्थितीशी तोंड देत एक एक दिवस पुढे ढकलणाऱ्या या कुटुंबाच्या घरी वीज कधी पोहचणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर मी हयात असेपर्यंत वीज पोहचेल का? असा उद्विग्न सवाल येथील बनाबाई पांडुरंग फोंडे या वृद्ध महिलेने विचारला आहे. या वृद्धेची आर्त हाक शासन दरबारी पोहचते का? यासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे.

## रिठद येथून शेगाव कडे पायदळ दिंडीचा प्रवास सुरु

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रिसोड रणजीत ठाकूर**



रिसोड तालुक्यातील रिठद येथील सर्व नवतरुण व महिला यांची दरवर्षीप्रमाणे यंदाही रिठद ते शेगाव पायदळ वारी आज दिनांक १८ जून रोजी शेगावकडे प्रयाण करत आहे. या दिंडीमध्ये सर्व नवीन होतकरू भजनी मंडळी सुद्धा सहभाग घेऊन या भजनी मंडळीची साथ घेत गण गण गणात बोते अशा घोषणेच्या सुरा मध्ये भक्ती गीते गात प्रवास सुरू झाला, असून पूढील चार दिवसांत हि पायदळ दिंडी शेगाव येथे पोहोचेल.या दिंडीचे चालक नवीन तरुण मंडळी असल्याने मोठ्या उत्साहात ही मंडळी सहभागी झाली आहे.यामध्ये अनेक महिलांनीही सहभाग नोंदवला आहे.जवळपास २०० ते २५० महीला -पुरुष भक्त सहभागी झाले आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## राजापूर–लांजा तालुका नागरिक संघ दि. 19 जुलै रोजी वाटूळ परिसरात 100 झाडे लागवड करणार...

**दैनिक युवक आधार**
**वाटूळ :- (प्रमोद तरळ)**

**राजापूर-** लांजा तालुका नागरिक संघ मुंबई यांच्या वतीने "चला वृक्ष लावू आणि जगवू" या उपक्रमांतर्गत गतवर्षी ', इंडियन ऑईल' या नामांकित कंपनीच्या सहकार्याने व रुक्मिणी भास्कर विद्यालय व्हेळच्या सहयोगाने वाटूळ दाभोळ रस्त्यावर व्हेळ परिसरात ५०० झाडांची करण्यात आली होती

यावर्षी याच रस्त्यावर वाटूळ परिसरात १०० झाडे लावण्याचा व जगविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी स. ९ वा. आयोजित केलेल्या या उपक्रमात रुक्मिणी भास्कर विद्यालय व्हेळ, जि.प. प्राथमिक शाळा विलवडे, वाटूळ व शिरवली या शाळांतील मुले या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

आपण सर्वांनी जि.प. प्रा. शाळा विलवडे येथे उपस्थित राहून मुलांना प्रोत्साहन द्यावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी अशी विनंती राजापूर लांजा तालुका नागरिक संघातर्फे करण्यात आली आहे





# गुटखा विक्रीवरून भाजप आमदारांचा संताप; रेवदंडा गुटख्याचे केंद्रबिंदू? – सरकार, पोलिस यंत्रणेवर गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

महाराष्ट्रात गुटखाबंदी असूनही राज्यभरात खुलेआम गुटख्याची विक्री सुरू आहे. भाजपचेच विधानपरिषदेतील आमदार श्रीकांत भारतीय यांनी यावर संताप व्यक्त करत थेट महायुती सरकारचेच वाभाडे काढले आहेत. "राज्यात गुटखाबंदी आहे हे विधानच आता हास्यास्पद वाटतं," असा टोला लगावत त्यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची जोरदार मागणी केली आहे.आमदार भारतीय यांच्या टीकेनंतर आता रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील गुटखा व्यवहार पुन्हा चर्चेत आला आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांपासून रेवदंड्यात राजरोसपणे गुटखा विक्री सुरू असून पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.



गुटख्यावर कारवाई होणार का ?

**रेवदंडा – गुटख्याचे "हब"?**

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गुजरातहून दर दोन दिवसांनी गुटख्याचा माल रेवदंड्यात पोहोचतो. पारनाका परिसरात खास गोडाऊन असून तिथून गुटखा साठवून संपूर्ण कोकणात पुरवठा केला जातो. या सगळ्या व्यवहारात दिवसाला लाखोंचा उलाढाल होत असून रेवदंडा हे गुटखा वितरणाचे केंद्रबिंदू बनले आहे, अशी लोकांमध्ये चर्चा आहे.स्थानिक पोलिसांवर दुर्लक्षाचा आरोप"जनतेकडून तक्रारी देऊनही स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी दुर्लक्षच केलं आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणा गुटखा माफियांशी संगनमताने काम करत आहेत का?" असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.मंत्र्यांचीही कबुली – ५३ ठिकाणी ३ कोटींचा गुटखा जप्त राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनीच नुकतेच कबूल केले की गेल्या एका महिन्यात ५३ ठिकाणी छापे टाकून तब्बल ३ कोटींहून अधिक किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. ही आकडेवारीच स्पष्ट दाखवते की गुटखाबंदी केवळ कागदावरच आहे."मुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी – जनतेची जोरदार मागणी"गुटख्यामुळे राज्यातील तरुण पिढीचे आरोग्य आणि भविष्य दोन्ही धोक्यात आले आहे. तरीही पोलीस व प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः दखल घ्यावी व दोषींवर कठोर कारवाई करावी," अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. गुटखा विक्रीस अक्षम्य अपराध ठरवत, शिक्षेत वाढ करण्याची मागणीही श्रीकांत भारतीय यांनी अधोरेखित केली आहे. आता पाहावे लागेल की भाजपच्या आमदाराच्या घरच्या आहेरानंतर सरकार आणि पोलिस प्रशासन जागं होतं का?

## अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होवुनही अद्याप आरोपी अटक नाही,

### आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) पक्षाचे पोलीस अधिक्षक ग्रामिन यांना निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे**

पैठण तालुक्यातील लिंबगाव येथे अट्रॉसिटी गुन्हा दाखल झालेल्या आरोपिंना तात्काळ अटक करण्यात यावी,याबाबतचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) पक्षाच्या वतीने पोलीस अधिक्षक ग्रामिन छत्रपत्री संभाजीनगर (औरंगाबाद) दि.७/७/२०२५ रोजी देण्यात आले. दिलेल्या निवेदनात असे म्हटले की,पैठण तालुक्यातील मौजे लिंबगाव येथे दि.९/७/२०२५ रोजी आमचे कार्यकर्ते मोटार सायकलवरुण गावात जात असतांना त्यांना अडवुन मारहाण करण्यात आली.व जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली,त्यामध्ये आठ ते नऊ लोकांवर पाचोड पोलीस ठाण्यामध्ये तक्रारीनुसार अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झालेला आहे. परंतु अद्यापही त्यांना पाचोडचे पीएसआय यांनी अटक केली नाही.दि.९/७/२०५ याच दिवशी अनखी दुसरी मारहानीची घटना झाली असुन त्यामध्ये अट्रासिटी चा गुन्हा दाखल झाली असुन त्यामध्ये पाच ते सहा आरोपी आहेत त्यांना ही अद्याप अटक करण्यात आली नाही.वरिल दोन्ही गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी पोलिस अधिक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे



मागणी करण्यात येत आहे.पाचोड पोलीस ठाणेतील पीएसआय हे कुणाच्या दबावाखाली काम करतात हे आम्हाला अद्याप कळायला मार्ग नाही.अट्रॉसिटी तक्रार केली म्हणुन आमच्या कार्यकर्त्यावर कलम ३०७,३९५ सारखी कलमा लावुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यामध्ये तक्रारदाराला साधे खर्चाटले नाही तरी ३०७ व ३९५ या सारखे गुन्हे दाखल करण्यात आले,व चार जनांणा अटक करण्यात आलेली आहे.हि बाब अत्यंत गंभीर असुन दलित व मागासवर्गीवर अत्यंत अन्याय होत आहे.हा खोटा गुन्हा आमच्या कार्यकर्त्यावर केला आहे तरी याची सखोल चौकशी करण्यात यावी व दरोडे व ३०७ चा गुन्हा दाखल झालेला तात्काळ रद्द करण्यात यावा गुन्ह्यातील तपास अधिकारी राम बारहाते हे विरोधी पार्टीच्या सोबत हातमळणी करत असुन आरोपींना मदत करत आहे म्हणुन हा तपास त्यांच्याकडून काढून घ्यावा,व दुसऱ्या अधिकाऱ्याकडे हा तपास देण्यात यावा. असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.या दिलेल्या निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) पक्षाचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष बाबुरावजी कदम,मराठवाडा उपाध्यक्ष दिलीप पाडमुख,जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण इंगळे,युवा जिल्हाध्यक्ष राकेश पंडीत,युवा जिल्हा कार्याध्यक्ष कृष्णा वाव्हळ आदिंच्या स्वक्षऱ्या आहेत.यावेळी सिध्दार्थ ठोकळ,ज्योतीराम वाव्हळ, संजय वाव्हळ,प्रदी सुनिल वाव्हळ,गंगाराम शरनागत,भगवान लोंढे,हरिभाऊ वाव्हळ,सुधाकर ससाने,विश्वनाथ वाव्हळ, संतोष साबळे,प्रदिप वाव्हळ,सुभास ससाने,ॠषिकेश लोंढे,अनिता लोंढे,संगिता लोंढे,कडूबाई वाव्हळ,यांच्यासह रिपाई (आठवले) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लांजा येथे मोफत पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

**दैनिक युवक आधार**
**लांजा - (प्रमोद तरळ)**

शहरात जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, रत्नागिरी विभाग यांच्या वतीने मोफत पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र व स्पर्धा परीक्षा वाचनालयाचे उद्घाटन अजिंक्य मंगल कार्यालय येथे शनिवार दि. २६ जुलै रोजी स.१० वा. आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन निलेश भगवान सांबरे यांच्या हस्ते होणार आहे.या केंद्रामार्फत सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिका अनुभवी व तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, सराव प्रश्नसंच मैदानी चाचणीचे संपूर्ण प्रशिक्षण, तसेच अधिकाऱ्यांसोबत संवादाचे विशेष सत्र आयोजित केले जाणार आहे. यासोबतच भगवान महादेव सांबरे मोफत रुग्णालय, रत्नागिरी येथे मोफत वैद्यकीय सुविधा घंदेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत अधिक माहितीसाठी योगेश पांचाळ – ८९९९६६३०७९,अड महेंद्र मांडवकर – ९४२३२९२५८५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे




## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**



साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज(ता.१८) त्यांच्या बसस्थानकाजवळील पुतळ्याला पुष्पहार अर्पन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष के.मुर्ती व आनंद मच्छेवार, अड.हरीभाऊ दर्शनवाड, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, मारोती सुंकलवाड, प्रहार क्रांती दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष भगवान मारपवार,माजी नगरसेवक ,शंकर भंडारे,शिवन्ना कलगोटूवार,सुरेश साकपेल्लीवार,सुभाष आगीमेलीवार,संतोष मारपवार,किरण कलगोटुवार,साई दिसलवार,राकेश उपरवार,अमोल इंगोले,रितेश मंत्रीवार,अशोक आरपेल्लीवार , संजय कोतूरवार, राज माहूरकर, पत्रकार गोकुळ भवरे, अड.मिलिंद सर्पे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## मंगला एक्स्प्रेसमधून 35 कोटीचे ड्रग्स अमली पदार्थ नियंत्रण विभागाने केले जप्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल रेल्वे स्थानकावर नार्कोटीक्स कंट्रोल ब्यूरो म्हणजेच अमली पदार्थ नियंत्रण विभागाने मोठी कारवाई करत सुमारे ३.५ किलोचे ड्रग्स जप्त केले आहे. मंगला एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांकडून हे ड्रग्ज आज सकाळी जप्त करण्यात आले आहे. खाण्याच्या पुड्यामध्ये हे ड्रग्ज ठेवण्यात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई गोपनीय माहितीनुसार करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत जवळपास ३५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. ही कारवाई केल्यानंतर ड्रग्ज रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेल्या प्रवाशांचा कोणत्या टोळीशी याचा संबंध आहे, तसेच कोणाला अटक झाली आहे का याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र अमली पदार्थ नियंत्रण विभाग आणि रेल्वे पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. पनवेल रेल्वे स्थानकावर अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणात ड्रग्स जप्त होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. शहरातील ड्रग्ज नेटवर्कचा मागोवा घेण्यासाठी तपास यंत्रणा सज्ज झाली असून, या कारवाईमुळे ड्रग्ज रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुरस्कृत युवक व महिला मेळाव्यात निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने शिलाई मशीन वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुरस्कृत युवक व महिला मेळाव्याच्या निमित्ताने निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिलाई मशीन वाटप कार्यक्रमात महिला सबलीकरणाचा एक सुंदर अविष्कार पहायला मिळाला. या कार्यक्रमाला संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या समवेत लोकनेता खासदार निलेश लंके, अड. रोहिणी खडसे*, भावनाताई घाणेकर यांचाही मानाचा सहभाग होता.गेल्या चार महिन्यांपासून निलेश लंके प्रतिष्ठानमार्फत महिलांना मोफत शिलाई प्रशिक्षण देण्यात येत होते. या प्रशिक्षणाचा समारोप करत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते




प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना *मोफत शिलाई मशिन्स* वाटप करण्यात आले. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, "महिलांसाठी आम्ही सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणार आहोत. महिला कोणत्याही पक्षाच्या असोत, त्यांच्यावर संकट आले तर पक्षपात न करता त्यांच्यामागे ठामपणे उभे राहा, हेच आमचं खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांना दिलेलं आवाहन आहे." त्याचबरोबर, आयोजकांनी हा कार्यक्रम "छोटा" असल्याचे सांगितले असले तरी, प्रत्यक्षात हा *एक भव्य आणि मनाला भावणारा कार्यक्रम* असल्याचे त्यांनी कौतुकाने सांगितले.

खासदार निलेश लंके यांनी महिलांना उद्देशून सांगितले की, "ही शिलाई मशीन मोफत दिली असली तरी ती घरासाठी उपयुक्त ठरेल, याची जबाबदारी प्रत्येक महिलेची आहे. या माध्यमातून कुटुंबाला आधार मिळावा हा उद्देश आहे."

विशेष उल्लेखनीय म्हणजे, रोहिणी ताई खडसे यांच्या वडिलांची प्रकृती गंभीर असतानाही त्यांनी कार्यकर्त्यांप्रती आपुलकी जपत या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली, हे सर्वांच्या भावनेला स्पर्शून गेले.

भावनाताई घाणेकर यांनी आयोजक हर्षल पाटील आणि राजश्री कदम* यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली."ते दोघेही प्रामाणिक आणि समाजाभिमुख काम करत असून, अशा तरुणांमुळेच पक्षाचे भवितव्य उज्वल आहे," असे त्या म्हणाल्या.


कार्यक्रमाच्या शेवटी आयोजक हर्षल पाटील व राजश्री कदम यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानत सांगितले की, "आमच्या नेत्यांनी जो आदेश दिला आहे, तो समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. पक्षाच्या वाढीसाठी आम्ही सातत्याने झटत राहू."

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे उपस्थितांचे मन भरून आले असून, "नेते मोठे असले तरी त्यांनी आमच्या छोट्याशा कार्यक्रमात येऊन उपस्थिती दर्शवली, याचा आम्हाला अभिमान आहे,"असे आयोजकांनी नमूद केले.

# हरवले सुर शेत लावणीच्या गीतातील....

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

शेतातील गीत म्हणजे "आंबोळी" गीत असे म्हटले जाते. शेतात काम करताना किंवा शेताशी संबंधित कामांच्या वेळी पारंपरिक पद्धतीने गायली जाणारी गाणी ही गाणी साधारणपणे भात लावणी, कापणी किंवा इतर शेतीच्या कामांच्या वेळी गायली जातात. जास्तीत जास्त भात लावणीच्या वेळी हि गीते खेडूपाड्यात गायली जात असत. या गीतामधून कष्टकऱ्यांची भावना, त्यांची जगण्याची रीत, निसर्गाशी असलेल्या त्यांचं नातं व्यक्त होतं. अशा या आंबोळी गीतांना विशिष्ट ताल, सूर, लय असतो जे सूर कामामध्ये उत्साह आणि लयता आणतात. ही गीते पिढ्यांनपिढ्या चालत आलेली असून त्यामध्ये पारंपरिक लोककला आणि संस्कृती जपली जाते .अशी गाणी साधारणपणे समूहांमधून गायली जातात ज्यामुळे एकसुरता आणि आनंदी वातावरण तयार होते. पूर्वीची शेती म्हणजे बैलांच्या मदतीने जमीन



नांगरून, पारंपारिक अवजारांचा वापर करून ,नैसर्गिक खतांचा वापर करून शेती केली जायची. नैसर्गिक रित्या पावसाच्या पाण्यावर ,विहिरीच्या पाण्यावर अवलंबून शेती केली जात असे. शेण, कंपोस्ट खत किंवा इतर नैसर्गिक खतांचा वापर केला जायचा. उत्पन्नाचे प्रमाण कमी असायचे पण नैसर्गिक रित्या पिकवलेल्या धान्याला महत्त्व होते.

आजकाल विकासाच्या नावाखाली शेतकऱ्याला शेती उरली नाही .पण जी आहे त्यातही आता मजा राहिलेली नाही. पूर्वी भात लावणीची कापणीची कामे करताना आलेला थकवा जाण्यासाठी एक विरंगुळा म्हणून पारंपारिक गाणी म्हटली जात होती.परंतु आता या गाण्यांचे सूर ऐकू येईनायसे झाले आहेत. पूर्वी भात लावणी करताना महिला एकमेकींच्या सुरात सूर मिळवून पारंपरिक अशी सुरेल गाणी म्हणत असत, या गाण्यांमध्ये आनंदी जीवन जगण्याचे महत्व ,निसर्गाशी असलेला नातं आणि देवाधिकांचीही आळवणी केली जात असे .अशाप्रकारे सामूहिक गायनामुळे शेतात काम करताना एक प्रकारचा उत्साह आणि चैतन्य पहावयास मिळत होते या पारंपरिक गीतांना"आंबोळ्या" असे म्हटले जात असे.परंतु आजच्या काळात शेती ही राहिली नाही आणि शेती आहे त्या शेतीची कामे करताना अशी एकत्रितपणे गायलेली गाणी आता ऐकू येईनाशी झाली आहेत. जुन्या पिढीला या आंबोळीचा सूर हरवल्याची खंत होत आहे. पौराणिक कथा, रुढी, भाषा, टीका टिपणी करणाऱ्या या सुरेल पारंपारिक गाणी,ओव्या कानी पडत नसल्यामुळे पुढील पिढीला याचा आनंद कधी मिळणारच नाही असे चित्र दिसत आहे. पूर्वी एकत्रित कुटुंब ,घरच्या घरी शेती केली जायची. मजुराला मजुरीचे पैसे द्यायला सुद्धा शक्य नसल्याने ,शेतकरी मजुरांवर अवलंबून न राहता घरातील पुरुष महिला कुटुंब एकमेकांच्या मदतीने सामूहिक पद्धतीने शेतीची कामे करत होते. शेतावरच चहा, नाश्ता ,पाणी, जेवण ,शेतातील मासे आणि शेतावरच कालवण बनत असे. याच वेळी ह्या अशा गोड आवाजात पारंपरिक गाणी सामूहिक पद्धतीने गायली जायची .दिवसभराचा शिण नाहीसा व्हायचा या गाण्यांनी. आणि आता हे गाणे गाण्यांचे सूर खलाटीत ऐकू येईनासे झाले आहेत .याची खंत जुन्या वयोवृद्ध महिला शेतकरी यांना नक्कीच जाणवत आहे.

## स्वरा कराओके स्टुडिओतर्फे 'मेरे मनपसंत गीत' कार्यक्रम उत्साहात संपन्न

### माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांची लाभली प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

स्वरा कराओके स्टुडिओतर्फे सीबीडी बेलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मेरे मनपसंत गीत' विथ अवर बिल्व्हड सिंगर्स' या संगीतमय कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात २५ गायक गायिकांचा सहभाग होता. संतोष ताजने, प्रणाली पावसकर, श्यामकांत पाटील, विवेक परब, जीत निकम, नायडू, महेश हेमराजनी, निर्मला धोत्रे, सागर उपश्याम, जाहिदा, मीना शर्मा, राजेश शाहीर, देविदास साळवे, मधुसूदन शेर्लेकर, निविदा तांबे, प्रतिभा चंदनशिवे, साबा खान, शांती शानू, मनोज शिंदे, राहुल मोरे, साईसार्थक पुजारी, कृष्णा पुजारी, शरद हर्ळणकर, रश्मी हर्ळणकर या गायकांनी आपल्या गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच यामध्ये चिमुकले गायक क्रिषा पुजारी व साई सार्थक यांनी सुद्धा आपल्या आवाजाने मने जिंकली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभलेले परेश ठाकूर यांचे या कार्यक्रमाचे आयोजक शरद हर्ळणकर, रश्मी हर्ळणकर यांनी स्वागत सन्मान केला. या संगीतमय कार्यक्रमातून नवगायकांनाही एक व्यासपीठ मिळाले असून या आयोजनाबद्दल उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.



## संतोष कांबळे यांना हेतू पुरस्सर त्रास !

### त्यांच्यावर तक्रार करणाऱ्यांवरच कारवाई कर माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि. १८ ( वार्ताहर ) :** पनवेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. २९ येथे रहात असणाऱ्या संतोष कांबळे यांनी बांगलादेशी, रोहिंगे या बेकायदेशीर स्थलांतरितांना उप भाडेपट्ट्याने जागा दिली अशा प्रकारची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये देण्यात आली आहे. जर त्यामध्ये सत्यता असती पोलिसांनी कारवाई केली असती. मात्र तसे काही न घडता संबंधिताला त्रास दिला जात आहे. त्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्या वरच कारवाई करावी अशी मागणी माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांनी केली आहे. पनवेल-को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बंदर रोड, जुना पनवेल-४१०२०६ येथील प्लॉट नं. २९ येथे संतोष उत्तम कांबळे राहतात. ते गेल्या अनेक वर्षांपासून येथे वास्तव्य आहे. दरम्यान या मालमत्तेचे ते केअरटेकर असल्याचे रमेश गुडेकर यांनी सांगितले. या ठिकाणी बेकायदेशीर रित्या बांगलादेशी ,रोहिंगे उप भाडेतत्त्वावर ठेवण्यात येत असल्याच्या तक्रारी पनवेल शहर पोलिसांकडे देण्यात आले आहेत. जर अशा प्रकार होत असेल तर पोलिसांनी कारवाई का केली नाही. संबंधित ठिकाणी छापे मारून बेकायदेशीर स्थलांतरितांना अटक का केली नाही. तसेच कांबळे यांना यांच्यावरही गुन्हा का दाखल केला नाही. असा सवाल माजी नगरसेवक गुडेकर यांनी केला आहे. याचा अर्थ एक खोटी तक्रार असून संबंधितांवर दिशाभूल केले म्हणून कायदेशीर कारवाई करावी. त्याचबरोबर कांबळे यांना नाहक त्रास दिला जात असल्याचे ते म्हणाले. ही जागा अत्यंत मोक्याची असून बिल्डरांची नजर आहे. परिणामी ती मोकळी करून येथे इमारत बांधण्याचा डाव आहे. त्यामुळेच संतोष कांबळे यांना खोट्या तक्रारी करून त्यांना तिथून हलवण्याचा डाव असल्याचा आरोप रमेश गुडेकर यांनी केला आहे.



## श्री साईबाबा मंदिरामध्ये चोरी ; चोरटा सी सी कॅमेरात कैद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि. १८ ( वार्ताहर ) :** पनवेल शहरातील तक्का येथील श्री साईबाबा मंदिरामध्ये अज्ञात चोरट्याने दानपेटीची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली असून सदर चोरी तेथे लावण्यात आलेल्या सी सी कॅमेरा मध्ये कैद झालेली आहे .

येथील श्री साईबाबा मंदिराचे लॉक तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून मंदिरातील दानपेटीतील रोख रक्कम अंदाजे ७ हजार रुपये ही घरफोडी चोरी करून घेऊन गेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .




## श्रीपत (नाना )काळुजी आव्हाड यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**



दि. १४ रोजी निफाड - काथरगाव येथील प्रगतशील शेतकरी श्रीपत (नाना) काळूजी आव्हाड (वय ८५) यांचे अल्प आजाराने निधन झाले.प्रगतशील शेतकरी शंकरराव आव्हाड यांचे ते बंधू तर विविध कार्यकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष आनंदा आव्हाड यांचे ते वडिल होते. त्यांच्या मागे पत्नी,भाऊ,एक मुलगा,सहा मुली,सून,नातवंडे असा परिवार आहे.

# पनवेलचे सुपुत्र देवेंद्र पाटील यांची राष्ट्रीय पातळीवर झेप, मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड

### उपसरपंच ते राष्ट्रीय उपाध्यक्ष: तळागाळातील अनुभवाचा आणि सातत्यपूर्ण कार्याचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
.पनवेलचे सुपुत्र, देवळोली ग्रामपंचायतचे उपसरपंच आणि सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र अनंत पाटील यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी देशपातळीवर कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे केवळ पनवेल तालुक्याचीच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्ह्याची मान उंचावली आहे. फेडरेशनच्या मुख्य कार्यालयात झालेल्या शानदार कार्यक्रमात, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर कच्छी यांच्या हस्ते देवेंद्र पाटील यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी राज सदावर्ते आणि कार्यालयीन प्रमुख सुरज नागे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**सदस्य ते राष्ट्रीय उपाध्यक्ष: एक प्रेरणादायी प्रवास**
देवेंद्र पाटील यांचा फेडरेशनमधील प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. एका सामान्य सदस्याच्या रूपात आपल्या कार्याला सुरुवात करून त्यांनी आपल्या कर्तृत्वाने अनेक महत्त्वाची पदे भूषवली. त्यांच्या कामाची दखल घेत सुरुवातीला त्यांची रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली. या पदावर काम करताना त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात तालुकानिहाय कार्यकारिणीची मजबूत बांधणी केली आणि अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यांच्या जिल्हा पातळीवरील उत्कृष्ट कार्यामुळे त्यांना महाराष्ट्र सचिवपदी पदोन्नती मिळाली. राज्य पातळीवरही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. आता त्यांच्या याच कार्याची आणि अनुभवाची दखल घेत त्यांना थेट राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. "योग्य आणि प्रामाणिकपणे काम करत राहिल्यास निश्चितच यश मिळते," अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**सामाजिक आणि प्रशासकीय कार्याचा भक्कम पाया**
देवेंद्र पाटील यांची ओळख केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून मर्यादित नाही, तर त्यांचा सामाजिक कार्याचा पाया अत्यंत भक्कम आहे. देवळोली ग्रामपंचायतचे उपसरपंच म्हणून त्यांनी गावात अनेक विकासकामे यशस्वी केली आहेत. त्याचबरोबर, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून ते शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या हक्कांसाठी नेहमीच आवाज उठवत आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रातील या अनुभवाचा फायदा आता त्यांना देशपातळीवर मानवी हक्कांसाठी काम करताना नक्कीच होईल.

**फेडरेशनच्या कार्याला मिळणार नवी दिशा**
या निवडीनंतर बोलताना फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी म्हणाले, "देवेंद्र पाटील यांच्यासारख्या तळागाळात काम करणाऱ्या आणि प्रशासनाचा अनुभव असलेल्या व्यक्तीमुळे संघटनेला निश्चितच बळकटी मिळेल. त्यांची कार्यक्षमता आणि सामाजिक तळमळ पाहता, ते मानवी हक्कांच्या चळवळीत मोठे योगदान देतील, असा आम्हाला विश्वास आहे."
देवेंद्र पाटील यांनी फेडरेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. ते म्हणाले, "माझ्यावर दाखवलेल्या या विश्वासाला मी पात्र ठरेन. सर्वसामान्यांचे हक्क अबाधित राखण्यासाठी आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन."
देवेंद्र पाटील यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भिवंडी शहर व ग्रामीण भागातील पत्रकारांना रेनकोटचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन

### सर्व पत्रकारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)
भिवंडी तालुक्यातील स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भिवंडी पत्रकार महासंघ व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या सहकार्याने भिवंडी शहर व ग्रामीण भागातील पत्रकारांना रेनकोटचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दिनांक 21/7/2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालय वळ येथे सकाळी 10.00 वाजता करण्यात आले आहे. त्याचबरोबर सर्व पत्रकारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन देखील आरोग्यम् धनसंपदा फाउंडेशन कल्याण चे अध्यक्ष श्री.जितेंद्र पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ.श्री. किशोर



बळीराम पाटील यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे प्रसार माध्यमांना दिली आहे. तसेच सर्व पत्रकारांनी वेळेचे भान ठेवून वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे .

## सामाजिक बांधिलकी जपत आपल्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप सायली साळुंके

उरण प्रतिनिधी तथा उरण कार्यालय प्रमुख
युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक चे अध्यक्ष मा. श्री. विकी भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी आपल्या युवा प्रतिष्ठान सोबत समाजपयोगी कार्यक्रम त्यांनी केला. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले होते. विध्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वेग वेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवले जातात. त्या पैकी एक उपक्रम म्हणजेज वह्या खाऊ वाटप. वह्या व खाऊ वाटप केल्याने युवा प्रतिष्टानचे रा. जि. केगाव शाळेने आभार व्यक्त करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. म्हात्रे यांनी आपल्या मनोगतातून शालेय प्रगती संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार व्यक्त केले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. विकी केशव पाटील व त्यांचे पदाधिकारी सुदेश पाटील , देवा पाटील, भावेश पंचाळ, प्रकाश म्हात्रे. या प्रसंगी शाळेत




मुख्याधपक वासुदेव म्हात्रे, शिक्षक काशीनाथ म्हात्रे, शिक्षक नरेश म्हात्रे व इतर शिक्षक उपस्थित होते.

# उरणचा ग्रामीण भाग कंटेनर वाहनांच्या विळख्यात नियमित प्रवाशांमध्ये संतापाची लाट

**दैनिक युवक आधार**
**उरणशहर/प्रतिनिधी**
उरण तालुक्यातीलपूर्व ग्रामीण भागात येणाऱ्या दिघोडे, वेश्वी, जांभूळपाडा, खोपटा ,कोप्रोली या गावातील मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात जड कंटेनर वाहनांच्या रांगाच रांगा लागत असून संबंधित वाहतूक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळत आहे. याशिवाय या वाहनांच्या वाढत्या रहदारी मुळे मुळातच सदोष बांधण्यात आलेल्या रस्त्यांची बिकट अवस्था झाली आहे हीदुरावस्था पहावत नाही. त्यामुळे उरणमध्ये आता जेएनपीटी प्रमाणेच तालुक्यातील ग्रामीण भागालाही कंटेनर वाहनांचा विळखा पडू लागला आहे. परिणामी येथील प्रवासी नागरिकांना जड वाहनांच्या कोंडीचा व अपघाताचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात संताप निर्माण झाला असून, या मार्गावर दूचाकी स्वारांचे मोठ्या प्रमाणावर अपघात झाले असल्याची माहिती या मार्गावरील नियमित प्रवासी अस्मित ठाकूर, संकेत ठाकूर, निलेश ठाकूर, अमर



ठाकूर, मनाली ठाकूर, सागर पोवळे, जयेश ठाकूर व अन्य प्रवाशांनी दिली आहे. जेएनपीटी बंदरावर आधारित कंटेनर मधील माल साठवणुकीसाठी उभारण्यात आलेली गोदामे ही पूर्वी उरणच्या पश्चिम विभागातच होती. मात्र ती सरकून सध्या खोपटा खाडी पडिकडील पूर्व विभागातही उभी राहिली आहेत. या गोदामांची संख्या वाढू लागली आहे. तालुक्यातील खोपटा कोप्रोली चिरनेर कळंबुसरे, विंधणे, भोम, टाकी, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, जांभूळपाडा आदी गावात ही गोदामे उभी राहत आहेत. त्यामुळे बंदरातून मालाची ने आण करणारी शेकडो जड कंटेनर वाहने या भागातील रस्त्यावरून प्रवास करू लागली आहेत. गोदामात ये जा करणारी कंटेनर वाहने उभी करण्यासाठी गोदामात वाहन तळ नसल्याने ही कंटेनर वाहने सध्या येथील रस्त्यावरच उभी केली जात आहेत. त्यामुळे या मार्गावर अपघात व कोंडी यांना येथील प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील प्रवासी नागरिकांमध्ये संतापची लाट उसळली आहे.

# स्मार्ट ग्राम पंचायत तिगांव, सामाजिक वनिकरण व रोजगार हमी योजना अंतर्गत भव्य उपक्रम

### स्मार्ट ग्रामपंचायत तिगावचे सरपंच डॉ.के.जी तुरकर यांची संकल्पना

### फळाचे वृक्ष औषधी वृक्ष व पर्यावरण पूरक अश्या 2200 वृक्षांची लागवड करण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया**
**तिगाव (ता.आमगाव जि गोंदिया ) :** तिगाव गाव ग्रामपंचायत ,सामाजिक वनीकरण विभाग व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) तसेच स्मार्ट ग्रामपंचायत तिगाव यांच्या संयुक्त विद्यमाने "माझी वसुंधरा 6.0" व "एक पेड मा के नाम" या उपक्रमांतर्गत दिनांक १८ जुलै २०२५ रोजी, शुक्रवारच्या दिवशी जवळपास सुमारे ८ हेक्टर क्षेत्रामध्ये वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत २२०० से झाडांची लागवड करण्यात आली असून त्यामध्ये फळझाडे, औषधी वनस्पती तसेच इतर पर्यावरणपूरक झाडांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी २०२४-२५ या आर्थिक वर्षात १००० बांबूच्या झाडांची लागवड करण्यात आली होती, त्यातील तब्बल ९०० झाडे यशस्वीरित्या जगली



आहेत, ही बाब ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद ठरली आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी अंजोरा येथील जिल्हा परिषद सदस्या श्रीमती उषाताई मेंढे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती छबुताई उके, तसेच ग्रामपंचायत तिगावचे सरपंच डॉ. कुंजनकुमार तुरकर, सामाजिक वनीकरण विभागाचे जिल्हा वनपरिक्षेत्र अधिकारी, तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी, ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. संदीप तिराले, पोलीस पाटील घनश्याम गायधने,तंटामुक्ती अध्यक्ष कैलास मेश्राम,सदस्य श्रीमती प्रियंका डोंगरे, माजी सदस्य श्री. निशा ताई मेश्राम, सदस्य श्री. अशोक कटरे,पत्रकार नरेश बोपचे तसेच जिल्हा परिषद शाळा व समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी, गावकरी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा वृक्षारोपण उपक्रम पर्यावरण संवर्धनासोबतच रोजगारनिर्मितीस देखील चालना देणारा ठरला आहे. गावकऱ्यांमध्ये पर्यावरणा विषयी जागरूकता निर्माण करून "हरित तिगाव" संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचे उद्दिष्ट या उपक्रमा मागे आहे.असे तिगाव ग्रामपंचायतचे सरपंच डॉ. कुंजन कुमार तुरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करते वेळी बोलले आहे. ग्रामपंचायत व सामाजिक वनीकरण विभागाच्या पुढाकारातून तिगाव गावाने एक आदर्श निर्माण केला असून, हा उपक्रम इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.
कार्यक्रमाच्या यशस्वीत्ते साठी ग्राम पंचायत अधिकारी कुणाल मेश्राम, रोजगार सहायक धनपाल कटरे, ग्राम पंचायत कर्मचारी जयेंद्र तुरकर, प्रशांत तुरकर, सुनीता पारधी, प्रिया मेश्राम यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाची संचालन सहायक शिक्षक रामेश्वर बागडे केले तर आभार प्रदर्शन उपसरपंच संदीप तिराले यांनी मानले हे मात्र विशेष.

## पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि लायन्स क्लबमार्फत अमरधाम स्मशानभूमी परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग, लायन्स क्लब ऑफ पनवेल, लायन्स क्लब ऑफ सरगम, लिओ क्लब ऑफ कळसेकर टेक्निकल कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम अमरधाम स्मशानभूमी परिसरात घेण्यात आला.पर्यावरणाच्या संवर्धनासाठी मा. आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. या कार्यक्रमाअंतर्गत वृक्षारोपण तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी उपस्थित मान्यवरांनी बहावा, करंज, कदंब, कांचन अशा विविध 45 देशी रोपांचे वृक्षारोपण केले. या कार्यक्रमासाठी लायन्स क्लब ऑफ सरगमचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा सुरभी पेंडसे, लायन्स क्लब डिस्ट्रिक्ट चेअरमन (पर्यावरण) मुर्तुझा अफसर, सदस्य अशोक गिल्डा, नंदकिशोर धोत्रे, नूतन धोत्रे, मंगला ठाकूर, प्रतिमा चौहान, संजय गोडसे, अल्केश शहा, स्वाती गोडसे, धवल शहा, अनिल परमार, महेंद्र लोहार उपस्थित असून लोकसहभागातून वृक्षारोपणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, अशोक मुने व सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंबे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.